पाक्षिक

वार्षिक वर्गणी रु. ३०

किंमत १ रुपया २५ पैसे

# शेतकरी संघटक

वर्ष १० वे

अंक १७ वा

२१ डिसेंबर १९९३

## आमचे आम्ही मालक

**— शरद जोशी**

**माझ्या शेतकरी भावानो, मायबहिणींनो आणि पोलिस भावांनो,**

शेतकरी भावांना, मायबहिणींना हाक घातल्यानंतर पोलिसांनाही मी आवाहन करतो आहे, अशाकरिता की, आजचा हा कार्यक्रम काही सभेचा नाही, आजचा हा कार्यक्रम आंदोलनाचा आहे. मी, शरद जोशी, राहणार आंबेठाण, ता. खेड, जि. पुणे कायद्याच्या दृष्टीने गुन्हा करून इथे उभा आहे. इथे येण्यापूर्वी या गावातल्या भाताच्या 'हलर'चं उद्‌घाटन मी माझ्या हातानं केलेलं आहे. माझ्याबरोबर मंचावर बसलेले, शेतकरी संघटनेचे दोन माजी अध्यक्ष, एक सध्याचे अध्यक्ष, तीन आमदार, शेतकरी महिला आघाडीच्या नाशिक जिल्ह्याच्या प्रमुख, लातूर जिल्ह्याच्या प्रमुख असे कित्येक कार्यकर्तेही माझ्याबरोबर होते. माझ्यासमोर बसलेले सर्व हजारो मायबहिणी हे देखील या बेकायदेशीर कृत्यामध्ये सामील झालेले आहेत. आणि आम्ही, तुमच्या दृष्टीने जो गुन्हा आहे असे कृत्य केल्याबद्दल आम्हाला आनंद वाटतो. त्याची जी काही शिक्षा द्यायची ती शिक्षा घ्यायला आम्ही तयार आहोत. तुम्ही अटक करणार असलात तर त्याकरिता आम्ही तयार आहोत.

परवाच्या दिवशी मी दिल्लीला होतो. अंदाजपत्रकाची चर्चा झाली. आणि अर्थमंत्री डॉ. मनमोहन सिंग मला म्हणाले की, "अंदाजपत्रकासंबंधी थोडी अधिक चर्चा करायची आहे, तुम्ही थांबू शकता का?" मी म्हटलं, आज थांबायला काही वेळ नाही, कारण मला नागपूरला लगेच जायचं आहे." "काय काम आहे?" म्हणाले तेव्हा मी त्यांना म्हटलं की "नागपूरला जाऊन एक बिगरपरवाना भाताचा हलर चालू करायचा आहे." ते म्हणाले, "त्यात अडचण काय आहे?" मी म्हटलं, "हिंदुस्थान देशामध्ये, तुमच्या राज्यामध्ये परिस्थिती अशी आहे की मोटारींचा कारखाना काढायचा म्हटला तर लायसेन्सची गरज नाही, विमानाचा कारखाना काढायचा म्हटला तरी लायसेन्सची गरज नाही, पण भाताची गिरणी टाकायची झाली तर त्याला लायसेन्स लागतं, कापसाचा रेचा टाकायचा झाला तर त्याला लायसेन्स लागतं, माझ्या शेतात पिकवलेला ऊस हा जवळच्या कारखान्यातच घातला पाहिजे, लांब कुठं नेता कामा नये असा कायदा आहे." अर्थमंत्री मला म्हणाले, "ही गोष्ट खरी आहे?" मी म्हटलं, "खरी आहे, तुम्हाला माहीत नाही?" ते म्हणाले, "हा कोणाचा कायदा आहे, राज्य सरकारचा का केंद्र सरकारचा?" मी म्हटलं "मला वाटतं हा केंद्र शासनाचा कायदा असावा, कारण भाताची गिरणी उघडायला परवाना कशाकरिता लागतो? भातावरची लेव्ही

### वाकर्ल्याने क्रांतीचा ध्वज खांद्यावर घेतला

शेतकरी संघटनेच्या औरंगाबाद अधिवेशनाच्या निर्णयाप्रमाणे स्वतंत्र झालेल्या भारतीय शेतकऱ्यांनी इंडिया सरकारचे सर्व निर्बंध झुगारून द्यायला सुरुवात केली आहे. ४२ च्या क्रांतीतील प्रसिद्ध असलेल्या चिमूरच्या परिसरातील वाकर्ला या गावी भात भरडण्यावरील सरकारी निर्बंध झुगारून देऊन एक हलर सुरू करण्यात आला आहे. दि. १३ डिसेंबर १९९३ रोजी श्री. शरद जोशींच्या हस्ते या हलरचे उद्‌घाटन झाले. वाकर्ला हे गाव चंद्रपूर, भंडारा व नागपूर या तीनही जिल्ह्यांच्या सीमेवरील असल्याने तीनही जिल्ह्यातील वीसपंचवीस गावांतील शेतकरी या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने हजर होते. उद्‌घाटनानंतर झालेल्या जाहीर सभेत श्री. शरद जोशींनी केलेले भाषण प्रकाशित करीत आहे.

वसूल करता यावी म्हणून. कोणाकोणाकडून लेव्ही वसूल करायची आहे हे परवान्यामुळे माहित होतं." मला अर्थमंत्री म्हणाले, "असा जर कायदा असेल तर तो कायदा महामूर्ख (Stupid) आहे."

ज्यांना माझ्यावर आणि या सगळ्या लोकांवर खटला भरायचा आहे त्यांना माझं हे भाषण कोर्टात सादर करावं लागेल. त्यांनी दिल्लीचे वित्तमंत्री डॉ. मनमोहन सिंग यांचं हे वाक्य पुराव्यामध्ये सादर केलं पाहिजे. त्यांच्या मते हा कायदा महामूर्ख आहे.

त्यावेळी मी त्यांना म्हटलं की, "हा महामूर्ख कायदा तोडण्याचं काम कोणाला तरी केलं पाहिजे. ते काम करायला मी चाललो आहे."

येथे जमलेल्या सगळ्यांचं मी अभिनंदन करतो. वाकर्ला गावामध्ये मी दुसऱ्यांदा येतो आहे. चिमूरमधे १९४२ साली जे कांड घडलं त्यात वाकर्ला गावाचा मोठा भाग आहे. गेल्या वेळी लक्ष्मीमुक्तीच्या कार्यक्रमाकरिता कार्यकर्त्यांनी किती प्रेमाने मला ओढून आणलं ते मला आठवतं आहे. त्यानंतर औरंगाबादच्या अधिवेशनाच्या तयारीकरता येथून जवळच शंकरपूरला आलो होतो. तेव्हाही इथली बरीच मंडळी हजर होती हे मला आठवतं आहे. औरंगाबादच्या अधिवेशनात आलेले ओळखीचे चेहरे मला इथं दिसत आहेत. आणि याच गावामध्ये आणखी एकदा इतिहास घडावा ही मोठी महत्त्वाची गोष्ट आहे. १९४२ च्या आंदोलनामध्ये चिमूर प्रकरण झालं. आणि त्या चिमूरच्या सगळ्या सत्याग्रहींना, ज्यांच्या गळ्याभोवती फासाचा दोर आलेला, तितक्यात केवळ स्वातंत्र्य आलं म्हणून जीवदान मिळून त्यांचा फासाचा दोर वाचला. त्या सगळ्या क्रांतीवीरांचं कौतुक करण्याकरिता खुद्द पंतप्रधान, ५१ वर्षांनी का होईना, इथे आले. आणि पंतप्रधानांच्या अर्थमंत्र्यांना हे माहीत नाही की गोऱ्या इंग्रजाची गुलामगिरी संपली पण त्यांच्या पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखाली काळ्या इंग्रजाची गुलामगिरी अजूनसुद्धा चालू आहे.

नवीन क्रांतीचा इतिहास इथून वाकर्ल्यातून घडायला सुरुवात होत आहे.

४२ साली चिमूरला क्रांती झाली, आज इथे १९९३ साली म्हणजे बरोबर ५१ वर्षांनी वाकर्ल्यामध्ये क्रांती घडते आहे. औरंगाबादच्या अधिवेशनात मी असं म्हटलं की ४२ साली जशी परिस्थिती होती तशीच परिस्थिती आज तयार झाली आहे. सरकार नावाची गोष्ट काही शिल्लक राहिलेले नाही. मुंबईमध्ये दिवसाढवळ्या गुंड लोक राजरोसपणे दारूगोळ्याची वाहतूक करीत आहेत, त्यांना पकडायला कोणी तयार नाहीत. आजच्या नागपूर टाईम्समध्ये पहिल्या पानावर, मुंबई-मधल्या एका मोठ्या माणसाची मुलाखत आहे. त्यात तो म्हणतो, "दाऊद इब्राहिम हा माझा मानलेला मुलगा आहे हे मी कबूल करतो." कित्येकजण म्हणतात की आम्ही दाऊद इब्राहिमच्या फार जवळची माणसं आहोत. त्यांना पकडायला कोणी एक पोलिस गेलेला नाही. दाऊद इब्राहिमला जे स्वतः इस्रायलला जाऊन भेटले त्या शरद पवारांचा वाढदिवस काल नागपूरच्या स्टेडियमवर मोठ्या उत्साहाने साजरा झाला, दाऊद इब्राहिमचे साथीदार म्हणून त्यांना पकडायला कोणी स्टेडियमवर गेलं नाही.

पोलिस आता इथं हजर आहेत. आपल्या सगळ्यांवर कदाचित खटला भरणार आहेत, माझ्यावर भरणार आहेत. औरंगाबादचं भाषण झाल्याबरोबर औरंगाबादच्या पोलिसांनी पहिल्यांदा काय पराक्रम केला, तर माझ्यावर खटला भरला. आज कशाबद्दल खटला भरला जाईल? इथं गावामध्ये भात पिकतो. तो भात पिकल्यानंतर बाजारात जाऊन विकावा लागतो. आणि घरी खायच्यापुरता भात सडायचा झाला तर एकतर मायबहिणींना घरी भात सडावा लागतो किंवा शेजारच्या गावी लांब चालत, डोक्यावर भाताचं बोचकं घेऊन जाऊन सडून आणावं लागते, तेव्हा तो आमच्या पोटात जातो. भात गावातल्या गावात सडण्याची सगळ्यांची सोय पाहिजे असेल तर गावामध्ये एक हलर असायला काही हरकत आहे का? पण कायदा म्हणतो की त्याला परवानगी मिळणार नाही. आपल्या शेतात तयार झालेला भात गावातल्या गावात सडून मिळण्याची सोय करायला कायद्याची परवानगी नाही. का म्हणून परवानगी मिळणार नाही? इथे आपले सगळे जे पोलिसभाऊ आहेत त्यांनासुद्धा मी हा प्रश्न विचारतो. त्यांना माहीत आहे, भाताच्या गिरणीला का परवाना मिळत नाही. जर का तिथं जाऊन योग्य त्या अधिकाऱ्याला पाचदहा हजार रुपये लाच दिली तर महिन्या दोन महिन्यांत हलरचं लायसेन्स मिळतं आणि हलरचं हे लायसन्स प्रामुख्याने कोणाला दिलं जातं? राज्यकर्त्या पक्षाच्या लोकांना दिलं जातं, पैसे घेऊन दिलं जातं. आणि राज्यकर्त्यांचा व नोकरदारांचा स्वार्थ चालत राहावा म्हणून आमच्या मायबहिणींना डोक्यावर भाताची बाचकी घेऊन लांबलांब जाऊन भात सडून आणावा लागतो.

माझ्या शेतात पिकणारा भात. तो कुठं सडायचा, कुठं विकायचा हे कोणी

ठरवायचं? मला वाटलं तर माझ्या घरी उखळामध्ये मी स्वतः सडेन, गावात सोयीस्कर हलर असला तर मी त्याच्याकडे जाईन आणि तांदूळ घेऊन जवळ शेजारच्या गावात भाव बरा असला तर तिथं जाईन, चंद्रपूरला जावंसं वाटलं तर तिथं जाईन आणि चांगला भाव मिळत असेल तर माझा तांदूळ घेऊन मी लंडनला नाहीतर न्यूयॉर्कलासुद्धा जाईन. तांदूळ विकायला कुठं जायचं ते मी ठरवणार आहे, ते ठरवणारं सरकार नाही.

लायसेन्स काढायला माझी हरकत नाही. पण मी हलर बसवल्यानंतर जो कोणी त्या कामावरचा साहेब असेल त्याने आपला इन्स्पेक्टर पाठवावा आणि सांगावं की गिरणी काढलीत ना मग सरकारी नियमाप्रमाणे रजिस्ट्रेशन फी काय पाचदहा रुपये आहे तेवढी द्या. असा एखादा हलर वगैरे चालू केला आणि तिथं साहेब रजिस्ट्रेशन फी मागायला आला तर अवश्य द्यावी पण साहेबाकडे परवानगीसाठी अर्ज करायला जाऊ नये.

भातवाल्यांचं आंदोलन होत नाही, होत नाही असं आपण बरीच वर्षे म्हणत आलो आहेत. परवा अंदाजपत्रकासंबंधी दिल्लीला जी चर्चा झाली त्या चर्चेनंतर साधारणपणे शेतकऱ्यांच्या मागण्या काय आहेत यासंबंधी वित्तमंत्रालयाने दिलेल्या बातम्या आज सगळ्या वर्तमानपत्रांमध्ये आहेत. आणि त्यात त्या काही पंधरावीस गोष्टी शेतकऱ्यांना पाहिजे आहेत असे लिहिले आहे त्यात एक नंबरची गोष्ट आहे 'भातावरची लेव्ही रद्द करावी' ही मागणी. भातावरील लेव्ही यंदा रद्द होईल अशी माझी जवळजवळ खात्री आहे. आपल्या आंदोलनाची आरोळी ठोकल्याबरोबर काय परिणाम झाला बघा. तेव्हा, आता पाऊल पुढेच टाका.

आणि माझ्या, कापूस उत्पादक भावानो, शेजारच्या राज्यात चांगला भाव मिळत असेल तर कापूस तिथं न्या आणि भाव मिळवा.

काही ठिकाणी पोलिस थांबवायचा प्रयत्न करतात. का? अकोला जिल्ह्यातील काही ठिकाणी पोलिसांनी दुसऱ्या राज्यात जाणारा कापूस थांबवायचा प्रयत्न केला. पण, त्या पोलिसांची इच्छा काय होती? शेजारच्या राज्यात आम्ही कापूस नेऊ नये अशी त्यांची इच्छा नव्हती; ट्रकभर कापूस नेत असलात तर आम्हाला ५००० रुपये द्या, टेंपो नेत असाल तर जो काही २०००, ३००० भाव आहे तितके पैसे द्या, बैलगाडी असेल तर ५० रु. द्या, ५० नसतील तर खिशात काय ५/१० रुपये असतील ते द्या, आणि तेही नसतील तर तुमच्या खिशातली एक विडीतरी काढून द्या, एवढीच त्यांची इच्छा. म्हणजे, त्यांचा हेतू कापसाची वाहतूक थांबवणे हा नाही, तर रस्त्यावर संध्याकाळी एकटादुकटा प्रवासी पाहून त्याच्यावर हल्ला करणारे दरोडेखोर जसे असतात, तसेच हे गणवेशातले दरोडेखोर आहेत.

मी इथे हजर असलेल्या माझ्या पोलिसभावांना आणि अधिकाऱ्यांना विनंती करतो की गणवेश ही सन्मानाची गोष्ट आहे, तुम्ही भाग्यवान म्हणून हा गणवेश घालण्याचा मान तुम्हाला मिळाला, गणवेश घालून चोरदरोडेखोरांचं पाप तुम्ही करू नका. आणि तुमचे जे भाऊ गणवेश घालून शेतकऱ्यांवर अशा तऱ्हेने दरोडे घालत असतील त्यांनासुद्धा समजावून सांगा की या गणवेशाचा असा अपमान करू नका. गणवेश घालून जर कोणी चोरी करायला गेला तर त्याला पोलिस म्हणत नाहीत. गणवेश घालून चोरी करायला गेलेल्या माणसाला गणवेशातला चोर म्हणतात. गणवेशातील चोर जर सापडला तर त्यांचा बंदोबस्त, चोराचा जसा बंदोबस्त केला जाईल, तसाच केला जाईल. कायद्याने मला काही हक्क दिले आहेत. कोणी चोराने, दरोडेखोराने जर माझ्यावर हल्ला केला तर मी माझं संरक्षण करण्याकरिता काय केलं पाहिजे हे मला कायद्याने सांगितलं आहे. तो चोर गणवेश घालून आला तर मी माझं स्वतःचं संरक्षण करू नये असं कायद्यानं सांगितलेलं नाही. एखाद्या बाईवर जर का एखादा गणवेशातला पोलिस हात उचलू लागला तर बाईला स्वतःच्या अब्रूचं रक्षण करण्याकरिता काय वाटेल ते करण्याचा हक्क कायद्याने दिलेला आहे. तेव्हा पोलिसांनी एवढं लक्षात ठेवावं की तुम्ही भाऊ आहात आमचे, गणवेशातले भाऊ आहात, आम्हाला तुमच्याविषयी अत्यंत आदर आहे, केवळ सरकार दरोडेखोरांचं झालं आहे, मुख्यमंत्री गुंडांचा झाला आहे म्हणून तुम्ही तुमच्या गणवेशाचा अपमान होऊ देऊ नका. कारण या देशामध्ये शेवटी विजय होणार आहे तो या देशाच्या मालकांचा होणार आहे, गुंडांचा आणि दरोडेखोरांचा नाही.

कापूस आम्ही पिकवलेला, शेजारच्या राज्यामध्ये सोळाशे भाव असला आणि इथं जर सरकार म्हणू लागलं की तुम्हाला फक्त हजार रुपयेच भाव मिळेल तर काय करायला पाहिजे? शेजारच्या राज्यामध्ये पोलिसांना जो पगार मिळतो, निदान तितका आपल्याला मिळाला पाहिजे अशी पोलिसांची जशी इच्छा, तसंच शेजारच्याच राज्यांतला भाव कमीत कमी आपल्याला मिळावा अशी कापूस उत्पादकांची इच्छा आहे. शेजारच्या कारखान्याच्या हद्दीतल्या उसाला जितका भाव मिळतो किमान

तितका माझ्या उसालाही मिळावा अशी ऊसउत्पादकांची इच्छा आहे. तेव्हा सरकार शेतकऱ्याला जेव्हा अशा परिस्थितीत अडवत तेव्हा त्यांनी दिलेला हुकूम हा बेकायदेशीर आहे.

तालुक्याच्या किंवा जिल्ह्याच्या अधिकाऱ्याचं किंवा मॅजिस्ट्रेटचं काय घेऊन बसलात, खुद्द केंद्रशासनाच्या अर्थमंत्र्यांनी सांगितलं आहे की भाताचा हलर काढण्यावर निर्बंध घालणारा कायदा मूर्खपणाचा आहे. तेव्हा पोलिसांनी शेतकऱ्यांवरील अशा तऱ्हेच्या निर्बंधाकरिता स्वतःचे हात उचलू नयेत, काठ्या उचलू नयेत.

या वाकर्ला गावामध्ये हलर काढला. हे भाषण करतांना मलाही माहीत नाही की पोलिसांनी काय करायचं ठरवलंय ते? कदाचित निघायच्या आधीसुद्धा अटक होण्याची शक्यता आहे. झालीच तर चांगलंच आहे. आपण सगळेच जण जाऊ तुरुंगात, बरं होईल आपली भाकरीची सोय होईल. अटक झाली नाही तर मी या गावातल्या सगळ्या भावांवर एक जबाबदारी सोपवून जातो आहे. मी इथून गेल्यानंतर, माझ्या हस्ते उद्‌घाटन झालेल्या हलरचा बचाव करण्याची आणि संरक्षण करण्याची जबाबदारी तुमच्यावर आहे. जर का कोणीही कायद्याने, कायद्याचा गणवेश घालणाऱ्या माणसांनी हा हलर बंद करण्याचा किंवा उचलून नेण्याचा प्रयत्न केला तर पहिली जबाबदारी मी महिला आघाडीच्या कार्यकर्त्यांना देतो; गावातल्या प्रत्येक महिलेने या हलरच्या जवळ उभं राहून तुम्हाला अटक झाल्याखेरीज हलरला कोणी हात लावू शकणार नाही याची काळजी घ्या. आणि ही जबाबदारी येथे जमलेल्या सर्वांवर आहे. हा हलर शेतकरी संघटनेच्या प्रतिष्ठेचा आहे. याला जर कोणी हात लावायला आलं तर इथे जमलेल्या आजूबाजूच्या गावांतल्यासुद्धा शेतकऱ्यांनी येऊन इथं उभं राहून सत्याग्रह केला पाहिजे. वाकर्ल्याच्या आसपास दहाबारा गावांतील एकूणएक शेतकरी तुरुंगात गेल्याशिवाय पोलिसांना या हलरला हात लावता आला नाही पाहिजे. तोपर्यंत बाकीच्या जिल्ह्यांतून, इतर राज्यांतूनही सत्याग्रही या हलरच्या संरक्षणासाठी मोठ्या संख्येने आलेले असतील.

आम्ही एक गोष्ट मागितली. शेतकऱ्याला काय पाहिजे? शेतकऱ्याला स्वातंत्र्य पाहिजे. आम्ही कष्ट करताना गाळलेल्या घामाचं दाम मिळालं पाहिजे ही आमची मागणी आहे. कालच्या कार्यकारिणीच्या सभेत मी सांगितलं, ८० सालापासून आम्ही घसा फोडून सांगतो आहोत की शेतकऱ्याला लुटायचा हा उद्योग चालू आहे आणि बाकीचे लोक म्हणायचे की, 'शेतकऱ्याची फार मजा असते. शेतकऱ्यांना किती सबसिडी मिळते, शेतकऱ्याला वीज स्वस्त मिळते, शेतकऱ्याला पाणी स्वस्त मिळतं, आणि वर इन्कमटॅक्स नाही.' अरे पण शतकऱ्याला मुळात लुटत असाल तर टॅक्स असेल कुठून? आम्ही सांगत होतो की शेतकऱ्याला सबसिडी नाही, शेतकऱ्याला खत महाग आहे; खताची सबसिडी म्हणतात ती शेतकऱ्याला भेटत नाही, ती एम्.एस्.ई.बी.चे अधिकारी खाऊन जातात; आणि वीज काय देतात? दिल्लीमध्ये वित्तमंत्री मला म्हणाले की, 'जगाच्या मानाने हिंदुस्थानातली वीज फार स्वस्त आहे. जी वीज तयार करायचा खर्च १ रु. ३० पैसे येतो त्यासाठी, आमची अशी इच्छा आहे, की शेतकऱ्यांनी निदान ५० पैसे द्यावेत.' मी त्यांना म्हटलं की, 'गावातली वीज कशी येते तुम्ही बघीतली काय? परदेशामध्ये विजेचा भाव १ रुपया आहे म्हणता, परदेशातल्यासारखी वीज आम्हाला इथे शेतात मिळाली तर मीसुद्धा १ रुपया द्यायला तयार आहे.' मी परदेशात पंधरा वर्ष राहात होतो त्या काळात फक्त दोनदा वीज गेली असं झालं. त्यावेळीसुद्धा आठ दिवस आधी वीजबोर्डाचं कार्ड आलं होतं की अमुक दिवशी अमुक वेळेला आम्ही वीज घालवणार आहोत तेव्हा काही महत्त्वाची कामं असतील तर आधी आटोपून घ्या आणि विजेवर चालणारी जी काही यंत्रं असतील त्यांचं संरक्षण करण्याची व्यवस्था करा.

आमच्या आंबेठाणला जी वीज येते तीची अवस्था काय आहे? एकही दिवस असा जात नाही की ज्या दिवशी तीन वेळा वीज तुटत नाही. विजेचा दाब कमीजास्त होणे तर सतत चालूच असते. कॉम्प्युटर चालवणे तर कठीणच पण विहिरीवरची मोटारसुद्धा अखंडपणे चालवणे शक्य होत नाही.

मी वित्तमंत्र्यांना म्हटलं की, 'परदेशातल्यासारखी वीज द्या, चोवीस तास द्या, ठराविक दाबाची द्या मी परदेशातला भाव तुम्हाला द्यायला तयार आहे.' पण सध्याच्या विजेकरता जर का तुम्ही जास्त भाव द्या म्हणालात तर आम्ही देणार नाही. आतासुद्धा विजेवर शेतकऱ्यांना सबसिडी नाही.'

शेतकऱ्याला सबसिडी किती दिली जाते? शेतकऱ्यांना सरकार देत असलेली सबसिडी किती दिली जाते? शेतकऱ्यांना सरकार देत असलेली सबसिडी उणे पन्नास टक्के आहे. म्हणजे शंभर रुपये जर

तुम्हाला मिळायला पाहिजे असतील तर तुम्हाला फक्त पन्नासच रुपये मिळावे अशी व्यवस्था या सरकारने केली आहे. आणि पन्नास रुपये जर कारखानदारांना मिळायला पाहिजे असतील तर त्यात शंभर रुपये मिळतील अशीही सरकारने व्यवस्था केली आहे. आता नेहरूव्यवस्था संपली, समाजवादी व्यवस्था रशियातही संपली. आता आपली घोषणा पाहिजे, आता यापुढे आम्ही गुलाम नाही, आम्ही आता स्वतंत्र आहोत, आम्हाला दुसरं काही नको.

आज आपण हलरचं उद्‌घाटन करून सत्याग्रहाचा कार्यक्रम केला याचा अर्थ काय? हा हलर चालू करून कोणी कोट्याधीश होणार आहे काय? दाऊद इब्राहीम सारख्यानं स्मगलिंगचा धंदा चालू केला तर तो कोट्यावधी रुपये कमावतो. हा हलरचा धंदा चालवून सगळा खर्च- वेच वजा जाता पंधरावीस रुपयेसुद्धा दिवसाकाठी जमा होणार नाहीत. तरीसुद्धा हा हलर आपण महत्त्वाचा का मानतो? हा हलर शेतकऱ्याच्या स्वातंत्र्याचं प्रतीक आहे. महाराष्ट्रामधील शेतकऱ्यांनी सगळे कायदे बाजूला टाकून आपल्या मालाची प्रक्रिया करण्याचं स्वातंत्र्य स्वतःकडे घेतलं त्याचं हे प्रतिक आहे. आज उद्‌घाटन म्हणून आपण सत्याग्रह केला आहे, त्या हलरचं संरक्षण करण्याकरिता तयार राहा. भातावरील प्रक्रियेच्या स्वातंत्र्याकरिता, भाताच्या लेव्हीला विरोध करण्याकरिता जो जो काही कार्यक्रम जाहीर केला जाईल त्यामध्ये उत्साहाने भाग घ्या आणि ४२ सालच्या चिमूरच्या क्रांतीची परंपरा राखून वाकल्यांने जो झेंडा आता हाती घेतला आहे तो डौलाने फडकवत ठेवा एवढीच विनंती. ●●●

# शेतमालाची निर्यात १८.७२% ने वाढली

एप्रिल ते नोव्हेंबर १९९३ या काळात भारताची शेतीमालाची निर्यात ५१६.७७ अमेरिकन डॉलर्सच्या किंमतीची झाली. मागील वर्षी याच काळातील शेतीमालाच्या निर्यातीची किंमत ४३५.२९ अमेरिकन डॉलर्स होती.

फुले आणि बीबियाण्यांच्या निर्यातीमुळे १० दशलक्ष अमेरिकन डॉलर मिळाले. बासमती तांदूळाची निर्यात २५.७५% ने वाढली.

जपानने तांदुळाच्या आयातीवरील निर्बंध उठविल्यामुळे जगातून जपानकडे तांदुळाचा ओघ सुरू होईल. पण जपानी लोकांना आवडणारा ग्लुटेनियस उर्फ जापोनिका जातीचा तांदूळ भारतात पिकविण्यात येत नसल्याने या सुसंधीचा फायदा भारतीय शेतकऱ्यांस होणार नाही.

येत्या १० वर्षांच्या मुदतीत प्रगत देशांतील शेतकऱ्यांना मिळणारी सबसिडी बंद होणार असल्याने तेथील शेतकरी अन्य पिकांकडे वळतील. यामुळे भारतीय शेतकऱ्यांस शेतमालाच्या निर्यातीसाठी मोठी संधी उपलब्ध होईल. मांस व अंडी यांची निर्यात वाढण्याची जबरदस्त संधी यामुळे मिळणार आहे.

(इकॉनॉमिक टाईम्स् १७/१२/९३ वरून)

●●●

**तक्ता क्र. १**

**GATT ला इंडिया शासनाने सबसिडी संबंधी १९९० साली दिलेल्या अहवालात शेतीमालालबाबत खोटे आकडे पुरवले होते. १९९३ साली हा अहवाल सुधारून देण्यात आला. १९९० साली केलेल्या गफलतीची टक्केवारी तक्ता**

| पीक / वर्ष | सबसिडी (दशलक्ष रुपये) | | १९९० च्या अहवालात केलेली गफलत % |
|---|---|---|---|
| | १९९० साली दिलेली माहिती | १९९३ साली दिलेली माहिती | |
| [1] | [2] | [3] | [4]=([3-2]*100)/[3] |
| तांदूळ | | | |
| 1986-87 | -11992.00 | -65708.00 | 81.75 |
| 1987-88 | -13904.00 | -58232.00 | 76.12 |
| 1988-89 | -44732.00 | -61679.00 | 27.48 |
| गहू | | | |
| 1986-87 | -2915.00 | -42281.00 | 93.11 |
| 1987-88 | -2520.00 | -40814.00 | 93.83 |
| 1988-89 | -12304.00 | -42422.00 | 71.00 |
| हरभरा | | | |
| 1986-87 | 291.00 | -6016.00 | 104.84 |
| 1987-88 | 654.00 | -4458.00 | 114.67 |
| 1988-89 | 1286.00 | -4504.00 | 128.55 |
| सोयाबीन | | | |
| 1986-87 | 54.00 | -929.00 | 105.81 |
| 1987-88 | 1015.00 | -840.00 | 220.83 |
| 1988-89 | 646.00 | -1116.00 | 157.89 |

**आमचा माल मालक आम्ही**
**कच्चा विकू वा पक्का करू**

# अथेति 'सफरचंद' पुराणम् ।

**– शरद जोशी**

### चार राज्यांच्या चार तऱ्हा

उत्तरेतील चार राज्यांत विधानसभेच्या पोटनिवडणुका झाल्या. शेवटच्या राज्यातील म्हणजे मिझोराम विधानसभेच्या निवडणुकांचे निकाल अजून यायचे आहेत. मिझोरामच्या निवडणुकांचे तसे काही उत्तर हिंदुस्थानातील इतर चार राज्यातील पोटनिवडणुकांशी लागेबांधे नाहीत, तेथील निवडणुकांचा विचार वेगळाच केला पाहिजे. उत्तर हिंदुस्थानातील पोटनिवडणुका झालेली चार राज्ये म्हणजे उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, राजस्थान आणि हिमाचल प्रदेश. ज्या राज्यांत अयोध्येच्या बाबरी मशिद कांडाआधी भा. ज. पा.चे शासन होते त्या चार राज्यांतील पोटनिवडणुकांचे निकाल चार प्रकारचे आहेत. उत्तर प्रदेशात हिंदूराष्ट्र, हिंदूएकता आणि हिंदुत्व यांचा फुगा दलित-मुस्लिम ऐक्याने फोडला. राजस्थानात अल्पमतातील का होईना, भा. ज. पा. शासन येईल. मध्य प्रदेशात काँग्रेस पक्षास जेमतेम बहुमत मिळेल. याउलट हिमाचल प्रदेशमध्ये प्रस्थापित भा. ज. पा. शासनाचा दयनीय पराभव झाला आहे. एकूण ६८ जागापैकी काँग्रेसला ५२ जागा मिळाल्या तर भा. ज. पा.ला केवळ ८. भा. ज. पा.चे माजी मुख्यमंत्री शांताकुमार यांचा काँग्रेसच्या एका किरकोळ उमेदवाराने पराभव केला. भा. ज. पा.चे बहुतेक माजी मंत्री, विधानसभा अध्यक्ष निवडणुकीत हरले. काँग्रेसला अपेक्षेबाहेर यश मिळाले आणि भा. ज. पा.च्या दुःस्वप्नात देखील आला नसेल असा पाडाव झाला.

### शांताकुमारांचे पानिपत

भा. ज. पा. सरकारची आणि शांताकुमार यांची लोकप्रियता घसरत आहे याचा काहीसा अंदाज सिमला नगरपालिकेच्या निवडणुकींच्या वेळी आला होता. त्यावेळी भा. ज. पा.चा एकही उमेदवार निवडून आला नव्हता. पण सिमला शहर डोंगरी प्रदेशात वसलेले आहे; तेथे काँग्रेसचा प्रभाव जुन्या काळापासून भक्कम होताच. भा. ज. पा.चा भरवसा डोंगराखालील खोऱ्याच्या प्रदेशातील पाठिंब्यावर होता. खालच्या भागातील मतांच्या आधाराने ९० साली निवडून आलो, यंदा पुन्हा निवडून येऊ अशी त्यांना खात्री होती. प्रत्यक्षात वेगळेच घडले. त्यांच्या बालेकिल्ल्यात म्हणजे कांगडा जिल्ह्यातील एकूण १६ जागापैकी भा. ज. पा.ला फक्त २ जागा मिळाल्या; खुद्द शांताकुमार यांचाही पाडाव भा. ज. पा.च्या बालेकिल्ल्यातच झाला.

### नोकरदारांशी झुंज

भा. ज. पा.चा एवढा दारुण पराभव होण्याची कारणे खास स्थानिक आहेत. त्याचा संबंध ना मंदिराशी, ना मशिदीशी. भा. ज. पा.च्या ध्येयधारणापेक्षा मुख्यमंत्री शांताकुमार यांचे खास व्यक्तीमत्व भा. ज. पा.च्या पराभवास कारण ठरले असावे. हा माणूस काहीसा मोरारजी शैलीचा प्रशासक आहे. शिस्तीचा भोक्ता, कठोर प्रशासक. घेतलेले निर्णय लोकप्रिय नसले म्हणजे ते अधिक निश्चयाने राबवायचा त्यांचा उत्साह वाढलाच. हिमाचल प्रदेशात सरकारी नोकर ही जबरदस्त ताकद आहे. एकूण मतदारांपैकी चौथा हिस्सा तर सरकारी नोकरच आहेत. बाकीचे मतदार दूर दूर खेड्यात राहणारे, त्यामुळे मतदानाच्या दिवशी त्यांची गैरहजेरी मोठी; पण सरकारी नोकर आणि त्यांचे कुटुंबीय न चुकता मतदानाचा हक्क बजावणारे असल्याने नोकरदारांच्या पाठींब्याखेरीज त्या राज्यात निवडून येणे कठीण आहे.

राममंदिराच्या प्रकरणी उत्तर हिंदुस्थानातील सरकारी नोकरवर्ग सगळा रामभक्त झाला होता; त्याला हिमाचल प्रदेश अपवाद नाही. साहजिकच, १९९० साली भा. ज. पा. निवडून आली. भा. ज. पा.च्या शासनाच्या काळांत नोकरदारांचा संप झाला; तो भा. ज. पा. सरकारने मोडून काढला. सैन्य बोलावले, टाडा लावला, डझनभर नोकरदारांना बडतर्फ केले, संपाच्या काळाचा पगार द्यायला नकार दिला. 'काम नाही, पगार नाही' अशी घोषणा केली. याविरुद्ध नोकरदारांनी आंदोलन केले. मुख्यमंत्री शांताकुमार यांनी तेही मोडून काढले. असली धोरणे लोकप्रिय थोडीच होणार? दूरदृष्टीने पाहिले तर शांताकुमारांचे प्रशासन देशाच्या दूरगामी हिताचे होते. पण राजकारणात यशस्वी होण्यासाठी देशाच्या हिताची कामे करून चालत नाही!

**हिमाचल प्रदेश :**
**निवडणूक निकालाचा अर्थ**

### सफरचंदाचे पुराण

जनांना अप्रिय कामे करायची झाली तरी ती हळूहळू, टप्प्याटप्प्यांनी करणे लोकशाहीतील मुख्यमंत्र्याला आवश्यक असते याचे भान शांताकुमारांना राहिले नाही. त्यांनी नोकरदारांना दुखावले, त्यापेक्षाही शेतकऱ्यांना दुखावले. भा. ज. पा.चा पाडाव झाला तो प्रामुख्याने सफरचंद बागायतदारांच्या मतांमुळे. निवडणुकीतील मतदानासंबंधी एरवी उदासीन असलेले सफरचंदउत्पादक या पोटनिवडणूकीत आग्रहा आग्रहाने जाऊन मतदान करून आले. राज्यातील मतदानाची टक्केवारी साठावर गेली तेव्हाच शांताकुमार आणि भा. ज. पा. यांचे 'पानिपत' होणार हे निश्चित झाले.

सफरचंदाच्या या कहाणीत शांताकुमार यांचा आडमुठेपणाही दिसतो आणि दुर्दैवही. एका अर्थाने ही मोठी विनोदी कथा आहे. पण त्याची किंमत चुकवावी लागली भा. ज. पा. आणि शांताकुमार यांना.

हिमाचल प्रदेशात सफरचंदाची लागवड वाढवण्याचे प्रयत्न अनेक वर्षापासून तेथील काँग्रेस सरकारने केले आणि फळांना चांगला भाव मिळावा यासाठीही काही योजना राबवल्या. हिमाचल प्रदेशच्या सरकारची सफरचंदाचा थंड रस विकणारी दुकाने देशभर जागोजाग, विमानतळावर, स्टेशनवर, सगळीकडे दिसतात. १९८० सालापासून सफरचंदांना आधारभूत किंमतही जाहिर करण्यात आली. १९८६ साली १ रु. ३० पैसे प्रतिकिलो किंमत होती; ती

हळूहळू वाढत वाढत १९९० साली २ रु. ७५ पैशावर पोचली.

### सारी सफरचंदे टका सेर

गंमत अशी की आधारभूत किंमत ठरली, पण ती कोणत्या प्रतीच्या सफरचंदाची? हा प्रश्न कोणी विचारला नाही आणि त्या प्रश्नाचे उत्तर देण्याचा प्रयत्नही कोणी केला नाही. कोणत्याही फळबागेत साधारणपणे ४/५ प्रतीची फळे येतात. पहिल्या दोन प्रकारची फळे पंचतारांकित आणि त्या खालोखालच्या उच्चभ्रू समाजात खपतात. चौथ्या आणि पाचव्या प्रतीची फळे बाजारात खाण्यासाठी फारशी खपत नाहीत, ती प्रक्रियेसाठीच द्यावी लागतात. फॅन्सी फळांना ४/५ रु. किलोच्यावर भाव सिमल्याच्या खालील परवानू आणि चक्की या बाजारपेठात दिल्लीचे व्यापारी आनंदाने देतच होते. २ रु. ७५ पैसे सर्व जातीच्या सर्व प्रतीच्या सफरचंदाचा सरसकट भाव ठरला, तो सर्व प्रतीच्या सफरचंदाचा सरासरी उत्पादनखर्चाच्या आधाराने ठरला. पण प्रत्यक्षात सरकारी खरेदीत फक्त चौथ्या आणि पाचव्या श्रेणीचा गचाळ माल २ रु. ७५ प्रतिकिलो या भावाने घातला गेला. गचाळ मालाला ही किंमत खूप चांगली. पण त्यामुळे सरकारला ३० कोटीचा तोटा सहन करावा लागला.

यावेळी शांताकुमार सरकार सत्तेवर आले. त्याने खालच्या प्रतीच्या सफरचंदानाच लागू असलेली आधारभूत किंमत कमी करून १ रु. ३० पैशावर आणून ठेवली आणि चांगल्या प्रतीची फळे पहिल्याप्रमाणेच ५ ते ७ रु. किलो या भावाने खुल्या बाजारात खपतील अशी व्यवस्था केली.

### चुकीच्या दुरुस्तीतील चूक

शांताकुमारच्या या निर्णयाचे समर्थन करण्यासारखे आहे. २ रु. ७५ पैसे प्रतिकिलो हा भाव सर्व प्रतीच्या फळांसाठी सरासरी भाव होता. सरकारी खरेदीत फक्त चतुर्थ श्रेणीचीच फळे येत होती. त्यांना सरासरी भाव दिला गेला ही तशी चूकच. ती सुधारणे आवश्यकच होते. पण चुका सुधारायची देखील लोकांना पचेल अशी एक पद्धत असते. तशी पद्धत अवलंबण्याची हुशारी मुख्यमंत्र्यांनी दाखविली नाही.

शिवाय माणूस तोंडाचा मोठा वाईट "सरकारची सगळी तिजोरी पहाडातल्या सफरचंदाच्या बागायतदारांच्या पदरात घालण्यासाठी आहे काय? मैदानातील किन्नो, नासपती बागायतदारांना काही मिळायला नको काय?" असा युक्तीवाद त्यांनी केला. सगळीकडे पक्का समज असा झाला की, भा. ज. पा. सरकार खोऱ्यातील शेतकरी विरुद्ध पहाडी शेतकरी लढवून 'फोडा आणि झोडा'ची नीती अवलंबित आहे.

मुख्यमंत्र्यांच्या निर्णयाला आणखी एक जबरदस्त समर्थन होते. जागतिक बँकेच्या मदतीने सफरचंदाचा एक भला व्यापक प्रकल्प तयार होत होता, तो राबवण्यासाठी जागतिक बँकेची पहिली अट अशी होती की, आधारभूत किंमतीची व्यवस्था रद्द झाली पाहिजे. आधारभूत किंमतीच्या व्यवस्थेऐवजी 'बाजार हस्तक्षेप व्यवस्था' जाहिर करण्यात आली. भाव १ रु. ३० पैसे किलो ठरवण्यात आला. झाले, शेतकरी संतापून उठले. रस्त्यावर आले, गोळीबार झाला; सरकारी घोषणेप्रमाणे तीन, शेतकऱ्यांच्या म्हणण्याप्रमाणे पाच शेतकरी गोळीबारात ठार झाले. त्या दिवसापासून सगळे सफरचंदाचे शेतकरी शांताकुमार यांचे शत्रू बनले.

### मला काय ठाऊकी?

पुढे चंद्रशेखर सरकार पडले, नवीन लोकसभेच्या निवडणुका जाहिर झाल्या. एप्रिल महिन्यात काळजीवाहू पंतप्रधान चंद्रशेखर आणि उपपंतप्रधान देवीलाल हिमाचल प्रदेशात गेले, सोलन येथील भाषणात चौधरी देवीलाल यांनी दणक्यात घोषणा केली, "सफरचंदाची आधारभूत किंमत २ रु. ७५ पैसे राहील. खरेदीत येणारा तोटा राज्यशासनाने निम्मा वाटून घेतला पाहिजे असे तत्त्व असले तरीपण राज्यशासनाची तयारी नसेल, तर केंद्रशासन सगळा तोटा सहन करेल; पण २ रु. ७५ पैसे किंमत शेतकऱ्यांना देईल"

उपपंतप्रधान देवीलालना पत्रकारांनी प्रश्न विचारला, ही किमान किंमत कोणत्या प्रतीच्या सफरचंदांकरिता आहे? पहिल्या प्रतीच्या की चौथ्या प्रतीच्या? देवीलालजींचे उत्तर, "ही किंमत चांगल्या प्रतीच्या (!) सफरचंदांकरिता आहे." पत्रकारांनी त्यांना धारेवरच धरले, तेव्हा चौधरीजींनी कबूल केले, "२ रु. ७५ पैसे ही किंमत कोणत्या प्रतीच्या फळांकरिता आहे हे कृषिमंत्रीच सांगू शकेल, मला काही ते सांगता येणार नाही!"

सफरचंदाच्या भावाची ही 'ट्रॅजी कॉमेडी' चालू राहिली आणि त्याची किंमत चुकवावी लागली भा. ज. पा. आणि शांताकुमार यांना, परवाच्या निवडणुकीत.

### सफरचंदांचा प्रभाव

या सगळ्या विश्लेषणात एक महत्त्वाचा धडा शिकण्यासारखा आहे. सिमल्याजवळ झालेल्या गोळीबारानंतर मी तेथे गेलो होतो. तेथे मला काश्मीर मधील सफरचंदाचा शेतकरी भेटला. तो म्हणाला हिमाचल प्रदेशात साडेचार लाख टन सफरचंद पिकते. काश्मीर काही फार मागे नाही. तेथे ४ लाख टन माल तयार होतो आणि उत्तर प्रदेशात २ लाख टन. आधारभूत किंमत फक्त हिमाचल प्रदेशात दिली जाते. येथले शेतकरी १ रु. ३० पैशांवर नाराज आहेत, पण काश्मिरमध्ये याच वेळी शेतकरी ६० पैसे किलो भावाने सफरचंद विकतो आहे. त्याला आज १ रु. ३० पैसेचा भाव मिळाला तर काश्मिरचा प्रश्नच शिल्लकच राहाणार नाही!

**ताजा कलम :** काँग्रेसचे वीरभद्र यांनी मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली आणि लगोलग दोनच घोषणा केल्या. बडतर्फ झालेल्या नोकरदारांना पुन्हा नोकरीत घेतले जाईल आणि फळबागायतदार शेतकऱ्यांच्या आंदोलनातील सर्व खटले बिनशर्त मागे घेतले जातील.

●●●

## तयारीत रहा

गुजराथमध्ये २६ जानेवारी १९९४ रोजी गुजराथ खेडूत समाजातर्फे वीज व इंधनाच्या दरांसंबंधी आंदोलन करण्याची वेळ येण्याची शक्यता आहे. 'शेतकरी तितुका एक एक' या आपल्या घोषणेप्रमाणे महाराष्ट्रातील वाघ शेतकरी गुजराथमधील शेतकऱ्यांच्या मदतीला येतील असा शब्द शेतकरी संघटनेने गुजराथ खेडूत समाजाला दिलेला आहे. यासंबंधीचा निश्चित कार्यक्रम ६ जानेवारी ९४ संघटकच्या अंकामधे सविस्तरपणे दिला जाईल तोपर्यंत सैनिक शेतकऱ्यांनी तयारीत रहावे.

# आता उरले कवित्व

## – शरद जोशी

### शिमगा संपला

उत्तरेतील चार राज्यांतील निवडणुका आटोपल्या, दिल्लीच्या नव्या विधानसभेची निवडणूकही झाली, मिझोराममधील निवडणूकीचे निकालही जाहिर झाले, आता उरले काय ते कवित्व.

### देश दूर नहीं।

दिल्लीचे राजधानी क्षेत्र आपल्या हाती आल्याबरोबर भा. ज. पा. च्या नेत्यांना साहजिकच आनंद वाटला. ''दिल्ली देशाची प्रातिनिधिक आहे'' असे अडवानी म्हणाले. दिल्ली जिंकली म्हणजे सारा देश जिंकल्यासारखेच आहे असे त्यांनी स्वतःचे समाधान करून घेतले असावे. पोटनिवडणुकीच्या काळात 'आज पाँच प्रदेश, कल सारा देश' अशी घोषणा भा. ज. पा. ने दिलीच होती. दिल्लीच सारा देश आहे म्हटल्यावर उद्या कशाला? आजच सारा देश हाती आल्यात जमा आहे. देशभरात कोठेतरी पाय रोवला की 'दिल्ली दूर नहीं।' अशी घोषणा देण्याचा प्रकार अनेक वेळा घडतो. पण दिल्ली मिळवून ''अब देश दूर नहीं।'' अशी घोषणा देण्याचा हा पहिलाच प्रसंग. भा. ज. पा. ने दिल्ली मिळवली आणि जवळजवळ सगळा देश गमावला. ''झाडांच्या फांद्या कसल्या तोडता, मुळावर घाव घाला,'' असे म्हणून पहिल्या बाजीराव पेशव्यांनी उत्तरेकडे फौजा वळवल्या आणि मराठ्यांचे भीमथडी घोडे अटकेपार गेले. भा. ज. पा. च्या बाजीरावांनी दिल्लीपार घोडे नेले आणि पेशव्यांनी पुणे घालवले तसेच दिल्ली सोडून सगळा हिंदुस्थान गमावला. दुर्दैवी गोष्ट अशी की, दिल्लीची राजधानी क्षेत्राची विधानसभा म्हणजे नगरपालिकेची सुधारलेली आणि वाढवलेली आवृत्ती आहे. दिल्लीच्या राज्यशासनाला कर्तबगारी दाखवायला काही मोठा वाव आहे असे नाही.

### आमदारांचा जयपुरी बाजार

म्हणजे भा. ज. पा. उरली ती फक्त राजस्थानात. तेथे भा. ज. पा.ला बहुमत मिळाले नाही, पण सत्ता हाती राहिली. डिसेंबर ९२ मध्ये शेखावत ''मी रजेवर आहे, निवडणूक संपताच मी पुन्हा रुजू होणार आहे.'' अशी शेखी मारत होते. थोडक्यात वाचले नाहीतर शेखावतांची रजा निवृत्तीपूर्व रजा ठरली असती. भा. ज. पा.ने आर्थिक चपळता दाखवली. एकएका स्वतंत्र उमेदवाराला एक कोटी रुपये आणि वर मंत्रीपद अशी किंमत गेलाबाजार ठरली, असे समजते. आमदारांच्या बाजारात खरेदी करायला पिशव्या घेऊन किंवा पोती घेऊन काँग्रेसचे बाजारमास्तर निघाले होते, पण शेखावत भजनलाल यांना भारी ठरले.

तसे म्हटले तर राजस्थानात सरकार बनवण्यासाठी काँग्रेस विधानसभा पक्षाच्या प्रमुखाला निमंत्रण देणे राज्यपालांना सहज शक्य होते, त्यांना कोण अडवणार? हरियानात तपासे राज्यपाल असताना भजनलाल यांना स्पष्ट मत असूनही देवीलाल यांना सरकार बनवण्यास पाचारण करण्यात आले होते. त्यावेळी या दोघांचे पक्ष आजच्या उलट होते. या प्रकरणावरून राज्यपालातील कोडगेपणाची कमालमर्यादा याचा उच्चांक म्हणजे तपासेसाहेब असे समजले जाते. हा उच्चांक तोडणे बळीराम भगत यांना काही अशक्य होते असे नाही, तसे त्यांचे प्रयत्न चालू होते, पण ऐनवेळी दिल्लीची सूचना वेगळी आली असावी. पोटनिवडणुकीत भा. ज. पा. इतकी नामोहरम झाली आहे की यावेळी भांडण काढण्याकरिता त्यांच्या हाती काही कोलित देऊ नये असे चाणक्यावतार पंतप्रधानांनी ठरवले असावे. चारसहा महिन्यात थोडा वरचढ भाव देऊन स्वतंत्र आमदारांना फोडून घेता येईल; आज त्याबद्दल वाद नको! याला म्हणतात मुत्सद्दीपणा!

### पाहुण्याच्या हातून साप मारणे

पण पंतप्रधानांच्या मुत्सद्दीपणाचा खरा कळस झाला तो उत्तर प्रदेशात. पोटनिवडणुकीत काँग्रेस हरणे आणि त्या बरोबर भा. ज. पा.ही हरणे यामुळे सगळ्यात जास्त संतोष कुणाला झाला असेल तर तो पंतप्रधानांना. उत्तर प्रदेशातली काँग्रेस सगळी उखडली गेल्यामुळे आता पक्षात त्यांच्या नेतृत्वाला उत्तर प्रदेशातून आव्हान येण्याची शक्यताच संपली. नारायणदत्त तिवारींचे आव्हान नेस्तनाबूत झाले, एवढेच नाही तर अयोध्येची डोकेदुखीही कमी झाली. मुख्यमंत्रीपदी मुलायमसिंग म्हणजे पंतप्रधानांच्या दृष्टीने सोन्याहून पिवळे. आता आयोध्येचे भांडण मुलायमसिंग आणि कल्याणसिंग, दोघांना एकमेकात भांडू द्या. भा. ज. पा.च्या 'भगव्या ब्रिगेड'ने काही अतिरेक केला तर हा प्रश्न राज्यशासनाच्या अखत्यारीतील आहे असे म्हणून अंग झाडून मोकळे होता येईल. मुलायम सिंगांनी पोलिसदलाचा वापर करून बजरंग दल आणि शिवसेना इत्यादिंना परस्पर धोपटून काढले तर आनंदी आनंदच आणि मुख्यमंत्र्यांनी अधिकृत पोलिसदल न वापरता खाजगी तबेल्यातील गुंड वापरून तेच काम केले तर मग त्याबद्दल काही बोलण्याचे कामच उरत नाही. या दोघा मांजरांच्या भांडणात लोण्याचा गोळा दिल्लीच्या माकडाच्या तोंडात पुढच्या निवडणुकीपर्यंत पडण्याची जवळजवळ खात्री आहे.

### कॉपी पकडणे हाच गुन्हा

मुलायमसिंग यांनी मुख्यमंत्री बनल्यानंतर पहिली घोषणा कोणती केली? भा. ज. पा. सरकारने परीक्षेत कॉपी करणाऱ्या विद्यार्थ्यांविरुद्ध एक कडक कायदा केला होता. निवडून आलेल्या शासनाने पहिल्या फटक्यात हा कायदा रद्द करून टाकला. आणखी एक नवा कायदा करून उद्या कॉपी करणाऱ्या विद्यार्थ्यांना पकडणाऱ्या पर्यवेक्षकांनाच जबरदस्त शिक्षा देण्याची तरतूद असलेला कायदा झाला तर त्याबद्दल कोणी अचंबा करू नये.

सहा महिन्यात विक्रीकर रद्द करण्याची घोषणाही उत्तर प्रदेशाच्या नव्या मुख्यमंत्र्यांनी केली आहे. त्या प्रकरणी त्यांना माघार घ्याची लागेल. उत्तर प्रदेशांत आजच अंदाजपत्रकाच्या ८० टक्क्यापेक्षा जास्त खर्च सरकारी नोकरांच्या पगारभत्त्यांवर होतो. विक्रीकर रद्द झाला तर त्यानंतरच्या पहिल्या तारखेला अधिकाऱ्यांचे पगार देणेसुद्धा शक्य होणार नाही आणि

नोकरदारांचा रोष कोणत्याही शासनाला परवडत नाही हे मुलायमसिंग यांना चांगले ठाऊक आहे. नोकरदारीला वेसण घालण्याची त्यांची मनीषाही नाही. नोकरदारीत आपली माणसे घुसवून हे सत्ताकेंद्र आपल्या हातात घेण्याची त्यांची व्यूहरचना आहे. त्यासाठी सरकारी उत्पन्न वाढवावे लागेल. नोकरदारांना खूष ठेवणे आणि कर कमी करणे दोन्ही एका वेळी शक्य नाही.

**यदुकुल रीति सदा चली आयी ।**

यापलिकडे जाऊन जीवनावश्यक वस्तूंचा कायदा आपण रद्द करणार असल्याची घोषणा मुलायमसिंग यांनी केली आहे. हा कायदा केंद्र शासनाचा आहे. तो रद्द करणे राज्य शासनाच्या अखत्यारीतील गोष्ट नाही. पण असल्या किरकोळ अडचणींनी विचलित होणे ही 'यदुकुल रीति' नाही हे बिहारचे मुख्यमंत्री लालूप्रसाद यादव यांच्या उदाहरणावरूनही स्पष्ट आहे.

**नोकरदारांची खुशामत**

हिमाचल प्रदेशचे नवीन मुख्यमंत्री काँग्रेसचे वीरभद्र यांनी भा. ज. पा. शासनाच्या काळात शिस्तभंगाकरिता बडतर्फ केलेल्या सर्व नोकरदारांना कामावर रुजू करून घेतल्याची घोषणा शपथविधीचा कार्यक्रम संपण्याआधीच करून टाकली. मुख्यमंत्रीपदी राहायचे असेल तर नोकरदारांना कधीही दुखवू नये ही युक्ती शांताकुमारांना समजली नव्हती. वसंतदादा पाटलांना उमजली नव्हती. नोकरदारांनी पुढाऱ्यांना मदत करावी, पुढाऱ्यांनी नोकरदारांना. म्हणजे परस्परांना मदत केल्याने 'परश्रेय' मिळते ही शिकवणूक शरद पवारांना जितकी समजली तितकीच वीरभद्र यांना. तेव्हा थोड्याच दिवसात वीरभद्र हे सगळ्या हिमाचल प्रदेशचे थोर नेते वगैरे म्हणवले जाऊ लागतील. निवडणुकीच्या निकालानंतरचे हे सगळे कवित्व. 'शिमगा संपला, कवित्व उरले'.

**जातीचा गर्वही आणि रागही**

पण या काव्यात सगळ्यात विनोदी कवित्व अर्थातच बाळासाहेब ठाकऱ्यांचे. उत्तर प्रदेशात भा. ज. पा.चा पराभव झाला म्हणजे जातीवादाचा विजय झाला याबद्दल त्यांनी मोठा खेद व्यक्त केला. म्हणजे जन्माने मिळणाऱ्या धर्माबद्दल गर्व बाळगणे हा महान गुण; या उलट, जन्मानेच मिळणाऱ्या जातीचे राजकारण करणे मात्र निषिद्ध, ही भूमिका समजणे कठीण आहे. ज्याचा गर्व बाळगावा त्या हिंदूधर्माचे नावच मुळात वर्णाश्रम धर्म; आपापल्या जातीला आणि वर्णाला नेमून दिलेली कर्तव्ये पार पाडली की सर्वोच्च श्रेय मिळते असे आग्रहाने सांगणारा. अशा धर्माचा अभिमान बाळगणारे कोणी हिंदुत्ववादी त्याच धर्माने घालून दिलेले धर्मकर्तव्य बजावल्याबद्दल हाकाटी करीत आहेत. हे मोठे विचित्र म्हटले पाहिजे. 'जातीवाद' याचा शब्दशः अर्थ जन्माच्या अपघाताने मिळालेल्या कोणत्याही गोष्टीचा अभिमान बाळगणे आणि त्या आधारे समाज आणि संघटना बांधू पाहाणे. बापजाद्यांकडून मिळालेली भाषा, जाती, धर्म, लिंग, संपत्ती यांच्या आधाराने माणसांची विभागणी करणे म्हणजे जातीवाद. मराठी विरुद्ध गुजराथी, मराठी विरुद्ध मद्रासी, मराठी विरुद्ध पुरभय्ये, हिंदू विरुद्ध मुसलमान अशा आगी लावण्यात जन्म घालविलेल्या हिंदु हृदय सम्राटांनी 'जातीवादां'च्या विजयाबद्दल दुःख व्यक्त करावे! बाळासाहेब आजकाल जोतिबा फुल्यांनाही मानू लागले आहेत. तेव्हा हिंदू समाज नेमकी काय गोष्ट आहे याची समज तीर्थस्वरूप प्रबोधनकारांइतकी स्वच्छ स्पष्ट लवकरच होईल अशी आशा करायला जागा आहे. हिंदुत्वाची गोधडी सगळ्या जातीच्या चिंध्यांना एकत्र शिवून झाली आहे, गोधडीची ओढाताण झाली तर ती प्रत्येक शिवणीवर उसवू लागले. याची जाणीव निवडणुकीच्या निमित्ताने हिंदुहृदय सम्राटांना झाली असेल, तर शिमगा अगदीच फुकट गेला असे वाटायला नको!

# हिंगोली येथे कापूस खरेदी विक्री आंदोलन

६ डिसेंबर १९९३ रोजी दुपारी ३ वाजता हिंगोली येथे गांधी चौकात शेतकरी संघटनेच्या वतीने खुल्या बाजारपेठेत कापसाची प्रतिकात्मक खरेदीविक्री करून कापसाच्या एकाधिकार खरेदीचा कायदा मोडीत काढण्यात आला. दोन दिवस सतत पाऊस पडत असूनसुद्धा, तसेच जिल्हाधिकाऱ्यांनी ३७ (३) कलम पुकारले असतांनासुद्धा पाचशेहून अधिक शेतकरी कापूस घेऊन हिंगोलीला जमले होते. हिंगोलीच्या सर्व रस्त्यांमधून शेतकऱ्यांनी मिरवूणक काढून आपल्या स्वातंत्र्याच्या घोषणांनी सारे शहर दणाणून सोडले. गांधी चौकात झालेल्या जाहीर सभेत शेतकरी संघटनेचे नेते डॉ. अशोक पातुरकर, श्री. ब. ल. तामसकर यांनी शासनाच्या शेतकरी विरोधी धोरणावर कडाडून टीका केली. त्यानंतर श्री. ब. ल. तामसकर यांनी काटा लावून फेडरेशनपेक्षा अधिक भावाने कापूस खरेदी केला व आम्ही कापूस विकणे व खरेदी करणे हे दोन्ही गुन्हे केलेले आहेत आणि त्याबद्दल काय शिक्षा द्यायची ती द्या असे त्यांनी शासनाला आव्हान दिले.

या कार्यक्रमाचे महत्व गावोगावच्या शेतकऱ्यांना समजावून देण्यासाठी अनेक कार्यर्त्यांनी परिश्रम घेतले.

●●●

**हिंगोली येथे कापूस काटा करून खरेदी करीत असतांना श्री. ब. ल. तामसकर. सोबत सर्वश्री. उत्तमराव वाबळे, पांडुरंग सामाले, डॉ. पातूरकर व इतर कार्यकर्ते.**

(छाया : राजू फोटो स्टुडिओ, हिंगोली)

# शुभकार्य! सावधान!

**– शरद जोशी**

**अखेर अंगठा उठला**

डंकेल प्रस्ताव अखेरीस मंजूर झाला. येती १० वर्षे तरी, म्हणजे नव्या शतकातच नव्हे तर नव्या सहस्रात प्रवेश करतांना पृथ्वीवरील वेगवेगळ्या मानव समाजांमधील वस्तूंच्या, सेवांच्या देवघेवींची नियमावली मान्य झालेल्या GATT कराराची तत्त्वे आणि तपशील यांनुसार होईल.

हिंदुस्थानच्या संसदेच्या दोन्ही सभागृहांत मोठा गदारोळ उडाला आहे. १४ डिसेंबर १९९३ रोजी करारावर सही करण्याचा अधिकार भारतीय प्रतिनिधी श्री. झुत्सी यांना दिला एवढेही कबूल करायला दिल्ली शासन तयार नव्हते. करारावर सह्या झाल्या हे १६ तारखेची वर्तमानपत्रे, टेलिव्हिजन इत्यादी माध्यमांमार्फत जगजाहीर झाले, तेव्हा कोठे शासनाने डंकेल प्रस्ताव ही भारताच्या हिताच्या दृष्टीने सर्वोत्तम व्यवस्था असल्याचे मान्य केले. शेतकरी, संशोधक इत्यादी घटकांच्या संरक्षणासाठी काही कायदेकानून बनवण्याची घोषणाही करण्यात आली.

नव्या दिल्लीत सचिवालयात बसणाऱ्या कोणा एका अधिकाऱ्याने किंवा मंत्र्याने देशाची आर्थिक स्थिती उघड्या डोळ्यांनी पाहिली असती आणि डंकेल प्रस्ताव बारकाईने समजून घेतला असता तर असा गोंधळ आणि फजिती झाली नसती. डंकेल प्रस्ताव आंतरराष्ट्रीय व्यापारासंबंधी आहे. भारताची निर्यातक्षमता प्रामुख्याने कच्चा माल आणि त्यावर थोडीफार प्रक्रिया करून तयार झालेला माल यातच आहे हे पाहता भारतानेही Gairns राष्ट्रांप्रमाणेच या प्रस्तावाचा उत्साहाने पाठपुरावा करायला पाहिजे होता.

**'इंडिय'वाद्यांची हातचलाखी**

पण देशात राज्य 'भारता'चे नाही, 'इंडियाचे' आहे. नेहरूव्यवस्था कोसळून पडली तरी खुल्या व्यवस्थेतही शहरी कारखानदार आणि भद्रलोक यांचाच वरचष्मा आहे. अगदी शेवटी, करारावर सही करतानादेखील शेतकऱ्यांच्या, संशोधकांच्या हिताचे संरक्षण करण्यासाठी नवीन कायदे करण्याचे मोठे नाटक झाले. डंकेल प्रस्तावातील तरतुदी शेतकरी इत्यादींना सोयीस्कर नाहीत, जाचक आहे असे क्षणभर मानले तर देशातील संसदेत कायदा पसार करून काय होणार? GATT कराराशी विसंगत असलेल्या तरतुदी कोणत्याही कायद्यात करणे आंतरराष्ट्रीय कराराशी विसंगत होईल. असे कायदे तयार करण्यात आले तर त्या विरुद्ध, करारावर सह्या करणाऱ्या ११७ राष्ट्रांपैकी कोणतेही एक तक्रार करू शकेल आणि शिस्तभंगाची कारवाईही GATT च्या कार्यक्रमात किंवा प्रत्यक्ष व्यापारात चालू करू शकेल.

याउलट, करारात शेतकरी आणि संशोधक इत्यादींच्या हिताला बाधा आणणारे असे काही नसेलच तर वेगळा कायदा करण्याची भाषा निरर्थक आहे.

**हिशोबाचे बोला**

सरकारच्या ह्या गडबडगोंधळामागे काही डाव शिजत आहे की काय? करारावर अंगठा उठवणे तर सरकारला भाग पडले पण तरीही त्यांतील तरतुदी प्रत्यक्ष अंमलात येऊच नयेत, कारखानदारांना संरक्षण आणि शेतकऱ्यांचे मरण ही नेहरूव्यवस्था GATT करार झाल्यानंतरही चोरीछुपे चालूच रहावी अशी कार्यवाही करण्याचा सरकारचा इरादा असावा. शेतकऱ्यांचे हितसंवर्धन इत्यादी गोंडस घोषणांचा आधाराने शेती लुटण्याचे सरकारी धोरण पुढे रेटून नेण्याचा शासनाचा इरादा दिसतो.

आता करारावर सही झाली. शेतकरी समाजाची सरकारकडून काय अपेक्षा आहे? शेतकऱ्यांच्या संरक्षणाच्या भाषेने आतां तो फसणार नाही. डंकेल प्रस्तावावरील चर्चेने निदान एक फायदा झाला. शेती मालाच्या किंमती आणि शेतीला लागणाऱ्या निविष्ठा व साधने यांच्या किंमती या दोनच मार्गांनी शासनाने सर्व शेतीवर ५० टक्क्यांवर कर लादलेला आहे हे सरकारी कागदोपत्री, अगदी आकडेवारीने सिद्ध झाले आहे. ३५ ते ९० टक्के सबसिडी शेतकऱ्यांना देणाऱ्या अमेरिका, युरोप आणि जपान यांच्यात डंकेल प्रस्तावाच्या निमित्ताने वादविवाद झाला पण त्यातून, भारतीय शेतकऱ्याला उणे ५० टक्के सबसिडी आहे, हेही सत्य प्रकाशात आले.

आमचे संरक्षण करण्याची भाषा सोडा, आमचा गळा दाबणारे तुमचे हात बाजूला करा एवढीच सरकारकडून शेतकऱ्यांची माफक अपेक्षा आहे.

**उणे सबसिडीचा बोजा**

देशाची निर्यात वाढावी, विदेशी चलनाची मिळकत वाढावी ही देशाची गरज आहे आणि शासनाची अपेक्षा आहे. गेल्या ५० वर्षांत नेहरूव्यवस्थेने शेतकऱ्यांवर केलेले सगळे घाव सोसूनही भारतीय शेतकरी आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत उतरण्याला तयार आहे, पण त्या बाजारपेठेत येणारा प्रत्येक शेतकरी स्वतःच्या सरकारकडून सबसिडी घेऊन आलेला असणार आहे. याउलट भारतातला शेतकरी उणे ५० टक्के

अखेर गॅट करारावर सर्व राष्ट्रांच्या सह्या झाल्या. इंडिया शासनालासुद्धा त्यावर सही करण्याशिवाय पर्याय नव्हता. हे पंतप्रधानांसकट सर्वांनी मान्य केले. इंडिया शासनाने सही केली असती किंवा नसती तरी हा करार होण्याचे थांबले नसते. आता शासनाने कितीही प्रयत्न केले तरी शेतीमालाच्या बाबतीत दुजाभाव करणे त्याला शक्य होणार नाही. यातून होणारा लाभ तेच लुटारू लुटून नेऊ नयेत म्हणून आता शेतकऱ्यांनी सावध राहिले पाहिजे. या सावधानतेसाठी शरद जोशींनी दिलेली हाक.......

सबसिडीच्या दंडबेड्या घालून तेथे जाणार आहे. परदेशी माल किमान ५ टक्के सबसिडी खाऊन बाजारपेठेत येईल. बलदंड राष्ट्रांतल्या शेतकऱ्यांच्या सबसिडीत २४ ते ३६ टक्क्यांची कपात प्रत्यक्षात झाली असे समजले तरी उरलेली सबसिडी मोठी सज्जड असणार आहे. भारतीय शेतकऱ्याला उणे ५० टक्के सबसिडीपासून +१० टक्के सबसिडीपर्यंत नेणे हे भारताच्या आर्थिक धोरणाचे महत्त्वाचे सूत्र येत्या दशकांत राहिले पाहिजे. कायम शेतकरीविरोधी राहिलेले हे सरकार शेतीला १० टक्क्यांपर्यंत सबसिडी काढून देतील अशी आशा बाळगण्याइतके शेतकरी भोळे राहिलेले नाहीत. पण उणे ५० टक्के सबसिडीचा बोजा डोक्यावर बाळगण्याइतके ते आता मूर्खही राहिलेले नाहीत.

भारतात आर्थिक सुधारणा आणण्याचे नाटक नोकरशाहीला यत्किंचितही धक्का लागणार नाही अशा बेताने राबवले जात आहे. नेमके त्या उलट, आंतरराष्ट्रीय खुलीकरणाचा GATT करार कार्यवाहीत आला तरी त्याचा कणमात्र फायदा शेतकऱ्यांना मिळू नये अशी धडपड सरकारतर्फे आणि शहरी कारखानदारांतर्फे होणार आहे. १० टक्के सबसिडी सोडा, ५० टक्क्यावरची उणे सबसिडी खलास करा एवढी आता सरकारकडून शेतकऱ्यांची माफक अपेक्षा आहे. यासाठी सरकारने काय पावले उचलावीत हे GATT करारातच स्पष्टपणे सांगण्यात आले आहे. आणि त्यावर केंद्र शासनाने अंगठा उठवला आहे.

**खुला व्यापार**

पहिली कार्यवाही म्हणजे शेतीमालाच्या वाहतुकीवरची आणि व्यापारावरील सर्व बंधने रद्द करणे. जिल्हा बंदी, राज्य बंदी, झोन बंदी यांना GATT करारात स्थान नाही. तसेच भातावरची लेव्ही, आदिवासी शेतकऱ्यांच्या मालाची सक्तीची खरेदी या व्यवस्थांमुळे GATT कराराचा भंग होईल. अन्नधान्य सुरक्षा राखण्याकरितां आवश्यक ती तरतूद करण्याचा शासनाला अधिकार आहे; पण ज्यांना गरज नाही त्यांच्यासाठीही सार्वजनिक वितरणव्यवस्था आहे असे दाखवून शेतकऱ्यांना लुटता येणार नाही. सार्वजनिक वितरण व्यवस्थेतून समाजातील वरच्या वर्गांना वगळणे कराराप्रमाणे आवश्यक आहे. आणि गरजू वर्गाला स्वस्त धान्य पुरवण्याचा बोजा यापुढे फक्त शेतकऱ्यांच्या माथी मारता येणार नाही, तो सर्व राष्ट्राने उचलावे लागेल.

**खुली निर्यात**

शेतीमालाच्या निर्यातीवरील बंधनेही उठवली नाहीत तर तेही GATT कराराशी सुसंगत होणार नाही. देशात वरकड उत्पादन होईल तेव्हा निर्यातीचा कोटा जाहिर करू, कोटा जाहिर करतांना नाफेडसारख्या संस्थांना प्राधान्य देऊ, त्यातले त्यात प्रक्रिया झालेल्या पदार्थांच्या निर्यातीलाच मान्य देऊ, ही असली लटपटपंची यापुढे चालणार नाही. सर्व निर्यातीला खुला परवाना, ज्याला पाहिजे तितकी, पाहिजे तेव्हा व पाहिजे त्या मालाची, निर्यात करता यावी अशी व्यवस्था आणणे ही GATT कराराखाली शासनाची नैतिक जबाबदारी आहे.

परदेशातील माल सरकारी खर्चाने आणून देशातील बाजारपेठेत लादून कच्च्या मालाच्या किंमती पाडण्याचा दुष्ट खेळ यापुढे चालणार नाही. अमेरिकन गहू आणून येथील शेतकऱ्यांना धडा शिकवण्याचे दिवस आता संपले. दुधाची भुकटी आणि तेल परदेशातून भीक मागून आणून येथील शेतकऱ्यांना बुडवण्याचे दिवस संपले.

**सावध! सावध!**

डंकेल प्रस्ताव संमत झाला. सगळ्या जगात यामुळे कोणाचा सर्वात मोठा विजय झाला असेल तर तो भारतीय शेतकऱ्यांचा. पण करारावर अंगठा उठवला म्हणजे भारत सरकार आता शेतकऱ्यांना न्याय देईल अशी आशा करण्यास काही जागा नाही. शेतकरीविरोधी धोरण संपावे यासाठी शेतकऱ्यांना सरकारवर अनेक मार्गांनी दबाव आणावा लागेल. GATT च्या कार्यकारिणीपुढे हिंदुस्थान सरकारच्या शेतकरीविरोधी दुष्ट नीतिचे पुरावे मांडून निर्णय बदलण्यास सरकारला भाग पाडावे लागेल. नवा करार ही 'बळीराज्या'ची एक पताका आहे पण ती सांभाळण्याचे काम शेतकऱ्यांना स्वतःच करावे लागणार आहे. खाटेवर पडल्यापडल्या कोणी हरी त्यांना भेटणार नाही!

## नाशिक जिल्ह्यांत वीजबिलांची जाहिर होळी

वीज बोर्डातील अनागोंदी कारभार, भ्रष्टाचार, अकार्यक्षमता यामुळे असून नसल्यासारख्या वीजपुरवठ्याची बिले मात्र नियमाने वाढीव दराने येतात. एकूणच सरकारच्या शेतकरीविरोधी धोरणाचे हा एक परिणाम आहे म्हणून नाशिक जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी वीजबिले न भरण्याचा निर्णय घेतला असून तो वीजबिलांच्या जाहीर होळ्यांनी प्रकट केला जात आहे.

३० नोव्हेंबर १९९३ रोजी निफाड तालुक्यातील ओझरमिग येथे वीजबिलांची होळी करण्यात आली.

६ डिसेंबर १९९३ रोजी शेतकरी संघटनेची जिल्ह्याची राजधानी सय्यद पिंपरी येथेही वीजबिलांची होळी करण्यात आली.

६ जानेवारी १९९४ राजी येवला येथे बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यासमोर मोठ्या प्रमाणात वीजबिलांची होळी करण्यात येऊन शेतकरी आपल्या स्वातंत्र्याचा आविष्कार करणार आहेत. या कार्यक्रमास संघटनेचे अध्यक्ष श्री. पाशा पटेल हजर राहणार आहेत.

वीजबिलांच्या होळ्यांच्या या कार्यक्रमात शेतकरी संघटनेचे नेते श्री. रामचंद्र बापू पाटील, नाशिक जिल्हा प्रमुख श्री. गणपत कातड, विभागप्रमुख श्री. मोहन गुंजाळ महिला आघाडी जिल्हाप्रमुख सौ. निर्मला जगझाप, शेतकरी महिला आघाडी कार्यकारिणी सदस्या सौ. स्मिता गुरव व नाशिक जिल्ह्यातील सर्व स्त्रीपुरुष कार्यकर्ते शेतकऱ्यांना मार्गदर्शन करीत आहेत.

**घरची लक्ष्मी नाही स्वतंत्र**
**का व्हावे तुम्ही स्वतंत्र?**

तक्ता क्र. २

## शेतीविषयक वाटाघाटी : पूरक माहिती

### भारतातील सबसिडी (पीकवार)

| पीक | देशांतर्गत प्रशासित किंमत रुपये/टन | | | आंतरराष्ट्रीय किंमत रुपये/टन | | | उत्पादन दशलक्ष टन | | | किंमत दशलक्ष रुपये | | | एकूण किंमत दशलक्ष रुपये | वार्षिक सरासरी किंमत दशलक्ष रुपये | सबसिडी रक्कम दशलक्ष रुपये | सबसिडी एकूण किंमतीच्या टक्के |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 1986-87 | 1987-88 [1] | 1988-89 | 1986-87 | 1987-88 [2] | 1988-89 | 1986-87 | 1987-88 [3] | 1988-89 | 1986-87 | 1987-88 [4] = [1*3] | 1988-89 | 1986-89 [5]=SUM [4] | [6]=AVG [4] | [7] = 3*(1-2) | [8]=([7]/[6])*100 |
| तांदूळ | 2190.00 | 2250.00 | 2400.00 | 3275.00 | 3275.00 | 3275.00 | 60.56 | 56.86 | 70.49 | 132626.40 | 127935.00 | 169176.00 | 429737.40 | 143245.80 | -61873.00 | -43.19 |
| गहू | 1660.00 | 1730.00 | 1830.00 | 2614.00 | 2614.00 | 2614.00 | 44.32 | 46.17 | 54.11 | 73571.20 | 79874.10 | 99021.30 | 252466.60 | 84155.53 | -41839.00 | -49.72 |
| मका | 1320.00 | 1350.00 | 1450.00 | 2984.00 | 2984.00 | 2984.00 | 7.59 | 5.72 | 8.23 | 10018.80 | 7722.00 | 11933.50 | 29674.30 | 9891.43 | -10496.00 | -106.11 |
| ज्वारी-बाजरी | 1320.00 | 1350.00 | 1450.00 | 2781.00 | 2781.00 | 2781.00 | 13.70 | 15.41 | 17.95 | 18084.00 | 20803.50 | 26027.50 | 64915.00 | 21638.33 | -22024.00 | -101.78 |
| तूर | 3200.00 | 3250.00 | 3600.00 | 5243.00 | 5243.00 | 5243.00 | 2.27 | 2.28 | 2.67 | 7264.00 | 7410.00 | 9612.00 | 24286.00 | 8095.33 | -4523.00 | -55.87 |
| हरभरा | 2800.00 | 2900.00 | 3250.00 | 4128.00 | 4128.00 | 4128.00 | 4.53 | 3.63 | 5.13 | 12684.00 | 10527.00 | 16672.50 | 39883.50 | 13294.50 | -4993.00 | -37.56 |
| उडीद | 3200.00 | 3250.00 | 3600.00 | 4385.00 | 4385.00 | 4385.00 | 1.24 | 1.29 | 1.59 | 3968.00 | 4192.50 | 5724.00 | 13884.50 | 4628.17 | -1394.00 | -30.12 |
| मूग | 3200.00 | 3250.00 | 3600.00 | 4782.00 | 4782.00 | 4782.00 | 1.08 | 1.22 | 1.42 | 3456.00 | 3965.00 | 5112.00 | 12533.00 | 4177.67 | -1752.00 | -41.94 |
| भुईमूग | 3700.00 | 3900.00 | 4300.00 | 3626.00 | 3626.00 | 3626.00 | 5.88 | 5.85 | 9.66 | 21756.00 | 22815.00 | 41538.00 | 86109.00 | 28703.00 | 2850.00 | 9.93 |
| सोयाबीन | 2980.00 | 3000.00 | 3200.00 | 3944.00 | 3944.00 | 3944.00 | 0.89 | 0.89 | 1.50 | 2652.20 | 2670.00 | 4800.00 | 10122.20 | 3374.07 | -962.00 | -28.51 |
| कापूस | 5400.00 | 5500.00 | 6000.00 | 17333.00 | 17333.00 | 17333.00 | 1.17 | 1.08 | 1.49 | 6318.00 | 5940.00 | 8940.00 | 21198.00 | 7066.00 | -14543.00 | -205.82 |
| राई-मोहरी | 4150.00 | 4300.00 | 4600.00 | 6672.00 | 6672.00 | 6672.00 | 2.61 | 3.46 | 4.38 | 10831.50 | 14878.00 | 20148.00 | 45857.50 | 15285.83 | -7955.00 | -52.04 |
| ताग | 2250.00 | 2400.00 | 2500.00 | 5599.00 | 5599.00 | 5599.00 | 1.32 | 1.04 | 1.21 | 2970.00 | 2496.00 | 3025.00 | 8491.00 | 2830.33 | -3833.00 | -135.43 |
| तंबाखू | 12000.00 | 12200.00 | 12800.00 | 12240.00 | 12240.00 | 12240.00 | 0.11 | 0.06 | 0.11 | 1320.00 | 695.40 | 1408.00 | 3423.40 | 1141.13 | 11.00 | 0.96 |
| ऊस | 170.00 | 185.00 | 195.00 | 156.16 | 156.16 | 156.16 | 85.22 | 93.94 | 85.69 | 14487.40 | 17378.90 | 16709.55 | 48575.85 | 16191.95 | 2405.00 | 14.85 |
| | | | | | | | | | | 322007.50 | 329302.40 | 439847.35 | 1091157.25 | 363719.08 | -170921.00 | -46.99 |

SOURCE : MINISTRY OF COMMERCE NEW DELHI.

GATT च्या वाटाघाटीत भाग घेत असता इंडिया शासनाने भारतीय शेतकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या विविध पिकांच्या किंमतीसंबंधी सादर केलेल्या अहवालात शेतकऱ्यांना असल्याचे कबूल केले असले तरी आकडेवारीची व तपशीलाची गफलत करून ती फक्त उणे २.३३% असल्याचे भासविले आहे. केंद्रशासनाच्या वाणिज्य मंत्रालयाने दिलेल्या या अहवालातील माहितीवरून भारतीय शेतकऱ्याला – ४६.९९% सबसिडी असल्याचे सिद्ध होते. ते दाखविणारा हा तक्ता श्री. शरद जोशी यांनी अंदाजपत्रकपूर्व चर्चेच्या वेळी केंद्रीय अर्थमंत्र्यांना सादर केला. (तक्ता १ व तक्ता २ यांचे विश्लेषण करून सरकारची शेतकरीविरोधी भूमिका स्पष्ट करणारा एक इंग्रजी लेख शरद जोशींनी लिहिला आहे. त्याचे मराठी रूपांतर पुढील अंकात देण्यात येईल.)

# परप्रांती गेले त्यांना १॥ कोटी मिळाले एकाधिकारात गेले त्यांचे १० कोटी बुडाले

## सीमापार कापूस आंदोलन अकोला जिल्हा लेखाजोखा

खुल्या अर्थव्यवस्थेचे १००% समर्थन करणाऱ्या शेतकरी संघटनेने महाराष्ट्रात सर्वप्रथम अकोला जिल्ह्यात "कापूस सीमापार" (परप्रांतात) नेण्याचे आंदोलन छेडले. शेतकऱ्यांनी उत्स्फूर्तपणे ह्या आंदोलनात सहभागी होऊन शासनाच्या एकाधिकारशाहीविरुद्ध आपले मत नोंदविले.

शेतकरी संघटनेचे राज्य कार्यकारिणीचे सदस्य प्रकाश पोहरे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी ह्या आंदोलनाची तीन टप्प्यांत आखणी करून महाराष्ट्रातून बऱ्हाणपूरला पोहोचणाऱ्या तीन वेगवेगळ्या रस्त्यांवरून कापूस सीमापार करण्याचे ठरवले. पहिल्या टप्प्यात किशोर माथनकर ह्यांचे उपस्थितीत केवळ अकोला जिल्हा दुसऱ्या टप्प्यात केवळ बुलढाणा जिल्हा तर तिसऱ्या टप्प्यात अकोला, अमरावती, बुलढाणा ह्या पश्चिम विदर्भाच्या तीन जिल्ह्यातून ह्या आंदोलनाची व्याप्ती वाढविण्यात आली आणि त्यामुळेच तिसऱ्या टप्प्यात हजारो शेतकऱ्यांसह सुमारे १३०० ते १५०० वाहने सहभागी झाली. प्रत्येक वेळी पोलीसांचे अडथळे पार करीत निर्धाराने शेतकऱ्यांनी आपली कापूस सीमापार नेऊन बऱ्हाणपूर मार्केटमध्ये विकला.

### सुमारे ७५ हजार क्विंटल कापूस परप्रांतात विकला

"कापूस सीमापार" आंदोलनाच्या पहिल्या टप्प्यात १७ नोव्हेंबरला हिवरखेड-झरीगेट-बारतांडा मार्गे ४० वाहनांमधून सुमारे एक हजार क्विंटल कापूस, तसेच दुसऱ्या टप्प्यात ३ डिसेंबरला खामगांव-नांदूरा-मलकापूर-एदलाबाद मार्गे ३९० वाहनांमधून सुमारे २४ हजार क्विंटल तर दिनांक ५ डिसेंबरला १३४१ वाहनांमधून ५० हजार क्विंटल असा एकूण १७७१ वाहनांमधून सुमारे ७५ हजार क्विंटल कापूस बऱ्हाणपूर मार्केटमध्ये नेऊन विकण्यात आला.

### शेतकऱ्यांना झालेला फायदा

सध्या महाराष्ट्रात फेडरेशनचे एकाधिकार योजनेत जाड्या एल्. आर्. ए. कापसाला १०२० रु. + ५० रु. = १०७०, १००७ ह्या कापसाला १००५ रु. आणि ए. के. एच्. ४ ला बारीक कपाशीला ९०५ रु. + ५० रु. बोनस = ९५५ रु. आणि एच्-४ कापसाला १०६० रु. प्रति क्विंटल असे भाव आहेत. ह्या उलट मध्य प्रदेशातील बऱ्हाणपूर बाजारपेठेत जाड्या कापसाला १२७० ते १२९० तसेच ए. के. एच्. ४ सारख्या बारक्या कापसाला ११५० ते ११८० पर्यंत भाव आहेत. सी.सी.आय्.ला अमेरीका व पाकीस्तानातील पीक बुडाल्यामुळे निर्यातीचे कंत्राट नुकतेच प्राप्त झाले. त्यामुळे बऱ्हाणपूर बाजारात पुढे आणखीही तेजी येण्याची शक्यता निर्माण झाल्याचे व्यापारी वर्तुळात बोलले जात आहे.

एकाधिकार योजनेमध्ये मागील २१ वर्षापासून ग्रेडरचा त्रास, मोजमापातील त्रास, हमालांची अरेरावी, त्यानंतर हुंडी आली नाही त्यामुळे पैसे मिळणार नाहीत, कर्ज कपातीचे अव्यवहार्य धोरण (जसे काकाचे कर्ज

**चोरून नव्हे, वाजतगाजत राजरोसपणे**
**आपला कापूस वाघ शेतकऱ्यांनी सीमापार नेला**
**महाराष्ट्र शासनाचा कापूस खरेदीतला लुटारू एकाधिकार झुगारून**

पुतण्याकडून व पुतण्याचे कर्ज काकाकडून कापून घेणे.) अशा अनेक कारणांनी वैतागलेल्या शेतकऱ्यांना ब्ऱ्हाणपूरच्या बाजारात येथील भावापेक्षा सुमारे २०० ते २५० रु. प्रति क्विंटल जास्त भाव आणि कुठलीही कटकट न करता त्वरित नगदी चुकारा मिळाला.

आंदोलनाच्या तीन टप्प्यांत मिळून सुमारे ७५ हजार क्विंटल कापूस विक्रीवर एकाधिकार योजना व आंदोलनात ब्ऱ्हाणपूरला मिळालेला भाव लक्षात घेता हा फरक सरासरी २०० रु. प्रति क्विंटल प्रमाणे ७५ क्विंटलचे १ कोटी ५० लाख रुपये (दीड कोटी) ह्या आंदोलनामुळे पश्चिम विदर्भातील शेतकऱ्याला मिळालेत ही ह्या आंदोलनाची यशस्वीताच म्हणावी लागेल.

ह्या उलट एकाधिकार योजनेत फेडरेशनची दि. ६-१२-९३ पर्यंत फक्त अकोला जिल्ह्यात ५ लाख, ७ हजार, ७७५ क्विंटल कापसाची खरेदी केली. आंदोलनात शेतकऱ्यांना मिळालेला भाव व एकाधिकार योजनेतील आजचे भाव ह्या मधील फरक सुमारे २०० रु. प्रति क्विंटल लक्षात घेता १० कोटी १५ लाख ५५ हजार रु. शेतकऱ्यांना आज कमी मिळालेत. हा आकडा फक्त आकोला जिल्ह्यातील आहे. बाकी महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी एकाधिकारात विकलेल्या कापसाची गोळा बेरीज केली तर आज शेतकऱ्यांचे एकाधिकारात कापूस विकल्यामुळे सुमारे १०० कोटी रुपयाचे वर नगदी नुकसान झाले आहे हे दिसून येवू शकते. जर फेडरेशनने संपूर्ण कापूस जसाच्या तसाच ब्ऱ्हाणपूरला नेऊन विकला तरी कोट्यावधी रुपये फेडरेशनला नफा मिळू शकतो. परंतु गेल्या २१ वर्षांचा अनुभव लक्षात घेता पुढे आगी लागतील, रुई विक्रीत भ्रष्टाचार नेहमीप्रमाणे होईल. नोकरशाहीचा अवाढव्य खर्च त्यामधून केला जाईल आणि शेवटी हा सर्व नफा ह्या नोकरशाहीच्या मगर जबड्यात "ॲडजेस्ट" होऊन कापूस उत्पादक शेतकऱ्याच्या हातात मात्र कटोरीच येईल हे सांगायला कोण्याही ज्योतीषाची गरज नाही.

**पोलीस आणि राजकारण्यांचा जळफळाट**

अकोला विभागातील शेतकरी आंदोलनात पोलीस विभागाने नोंद केलेली वाहने (तिन्ही टप्प्यातील) १७७१ एवढी आहेत. त्यमध्ये मोठे ट्रक, ट्रॅक्टरचा समावेश आहे. वेगवेगळे पोलिस स्टेशन व सीमेवरील चौक्या मिळून पोलिस एन्ट्रीचे रेट ६७०० ते ७००० रु. प्रती ट्रक असे आहेत. एका ट्रकमध्ये ७० क्विं. कापूस साधारणतः जातो. म्हणजे एन्ट्रीचा दर १०० रु. प्रति क्विंटल साधारणतः पडतो. ७५ हजार क्विंटल कापूस आंदोलनाद्वारे एन्ट्री न देता संघटनेच्या नेत्यांनी बाहेर नेला म्हणजे ७५ लाख रुपये पोलीसांची एन्ट्री चुकली त्याचे हप्त्याचे पीक बुडाले. त्यामुळे पोलीस खात्यातील लहानापासून तो मोठ्या अधिकाऱ्यापर्यंत सर्वच अधिकाऱ्यांचा संघटनेच्या आंदोलनावर आणि पदाधिकाऱ्यांवर रोष आहे. त्याच रोषापायी संघटना नेते प्रकाश पोहरे यांना केवळ ११० रु. चा डाका टाकून लुटण्याच्या खोट्या आरोपाखाली धारणी पोलीसांनी अटक केली होती. संघटनेच्या कार्यकर्त्यांनी आणि शेतकऱ्यांनी रास्ता रोको, बंद, निदर्शने, उपोषणे आदी मार्गांनी ह्या कारवाईचा निषेध केला होता.

एकंदरीत शेतकरी संघटनेच्या सीमापार कापूस आंदोलनामुळे आंदोलनात कापूस विकणाऱ्या शेतकऱ्यांच्या घरात भाव फरकाच्या रूपाने १ कोटी ५० लाख रु. जास्तीचे येऊन पोलीसांचे हप्त्याचे पीक बुडाले हे निर्विवाद सत्य आहे. हेच शेतकरी आंदोलनाचे फलीत आहे. निर्धाराने आंदोलन चालवून पहिल्या गाडीवर स्वतः समोर राहून आंदोलनाचे नेतृत्व करणारे प्रकाश पोहरे आणि त्यांचे सहकारी तसेच अमरावती, अकोला, बुलढाणा, यवतमाळ जिल्ह्यातील संघटनेचे जिल्हा प्रमुख आणि तालुका प्रमुख यांनी हे आंदोलन यशस्वी केल्यामुळे संघटनेविषयी शेतकऱ्यांच्या अपेक्षा मात्र वाढलेल्या दिसून येत आहेत.

●●●

# नांदेड येथे शेतकरी संघटनेतर्फे जाहीर कापूस खरेदी

नांदेड जिल्ह्यातील कार्यकर्त्यांची बैठक दिनांक ३ डिसेंबर रोजी पार पडली. या बैठकीत शासनाची एकाधिकार मक्तेदारीच्या विरोधात १० डिसेंबर ९३ (सुरेगाव गोळीबार हुतात्मा दिनी) जिल्हाधिकारी कार्यालयाच्या समोर कापूस-ऊसाची जाहररित्या खरेदीविक्री (प्रतिकात्मक) कार्यक्रम घेण्याचे बैठकीत ठरले आहे.

बैठकीत १० कार्यकर्त्यांवर जिल्ह्यातील किमान ५०० गावे बळीराज्य गावे नाना पाटील ब्रिगेडसह तयार करण्याची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. या कार्यकर्त्यांनी शपथ घेऊन संकल्प केला आहे. जोपर्यंत हा संकल्प पूर्ण होणार नाही तोपर्यंत कार्यकर्ते आपल्या उजव्या खांद्यावर (शर्टला) काळा डाग लावून फिरतील. असाही संकल्प करण्यांत आला आहे.

बैठकीतील सर्व निर्णयाची अंमलबजावणी रोख ठोक करण्याची परिस्थिती तयार झालेली असल्याने डिसेंबर महिना धाकधुकीत जाणार असे एकूण वातावरण तयार होत आहे. महिन्याच्या शेवटी उसाचे आंदोलन उभे राहण्याची शक्यता आहे. उसाचे मोठ्या प्रमाणात गऱ्हाळे उभे करण्याचा प्रयत्न चालू आहे. सध्या शेतकऱ्यांचा कल गुऱ्हाळे सुरू करण्याचाच असल्याने उसाचे आंदोलन उभे राहील असे वाटते. सध्या तरी साखर कारखाने मस्तीत आलेले नाहीत. पण पुढे मस्तीत येण्याची शक्यता आहे.

*(या बैठकीत ठरल्याप्रमाणे १० डिसेंबर रोजी कापूस खरेदीचा कार्यक्रम मोठ्या जोशात झाल्याचे वृत्त आहे. सविस्तर बातमी पोष्टखात्याच्या संपामुळे अजून हाती आली नाही.)*

**माल आमचा मालक आम्ही, भावेल तिथे विकू आम्ही**

# आंदोलन ४२च्याच पद्धतीचं हवं

## कार्यकारिणीत शरद जोशींचे मनोगत

शेतकरी संघटनेच्या कार्यकारिणीची तातडीची विशेष बैठक हुतात्मा बाबू गेनू यांच्या स्मृतिदिनी, १२ डिसेंबर १९९३ रोजी नागपूर येथे झाली. या बैठकीत औरंगाबाद अधिवेशनाच्या ठरावांच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यात आला. प्रामुख्याने, शेतीमाल विक्रीच्या संबंधाने आंदोलने झाल्याचे आढाव्यात दिसून आले. त्यातही शासनाचा कापूस खरेदीतील एकाधिकार नाकारून परराज्यात कापूस विक्री करण्याच्या आंदोलनामध्ये कापूस उत्पादक शेतकरी मोठ्या प्रमाणात सहभागी झाले. ऊसउत्पादक शेतकऱ्यानी बऱ्याच ठिकाणी गुऱ्हाळे सुरू केली. काही भागात साखर कारखान्यांबरोबर भावाच्या बाबतीत बोलणी केली. लक्ष्मीमुक्ती व दारूदुकानबंदी या आंदोलनाच्या बाबतीत आणि त्या अनुषंगाने गावाच्या वेशीवर बळीराज्याच्या फलक लावणे या कार्यक्रमाबाबत अजूनही कार्यकर्त्यांनी विशेष जोर दिलेला दिसत नाही.

अधिवेशनातील ठरावांच्या अंमलबजावणीच्या आढाव्यावर आपली प्रतिक्रिया व्यक्त करतांना श्री. शरद जोशी म्हणाले,

औरंगाबादचा निर्णय जाहीर झाला त्यावेळी मी म्हटलं होतं की १९४२ चीच परिस्थिती देशात आहे त्यामुळे ४२ च्याच पद्धतीचं आंदोलन शेतकऱ्यांनी करायचं आहे. अधिवेशनानंतरच्या आंदोलनाचा आढावा सगळ्यांनी दिला तो मी ऐकला. त्या वेगवेगळ्या आंदोलनांच्या पद्धतींबद्दल मी काही टीकाटिप्पणी करण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. कारण आंदोलनाचा निर्णयच असा आहे की आपलं स्वातंत्र्य टिकविण्याकरिता ज्याला ज्याला जे जे योग्य वाटेल ते त्यानं करावं. त्या त्या वेळी मनाची धारणा काय आहे ते प्रत्येकाने ठरवायचं आहे. घरावर कुणी दरोडा घालायला आला, आपल्या घरातल्या मुलांना, बायकामाणसांना कुणी हात लावायला लागला तर आपण काही कुणाची परवानगी मागायला जात नाही, दरोडेखोराला विरोध करण्यासाठी. त्यावेळी जे योग्य वाटेल ते करणं हा प्रत्येक माणसाचा अधिकार आहे.

पोलिस त्रास देतात मग त्यांना कसं काय उत्तर द्यायचं? १९८१ साली पिंपळगाव बसवंतच्या सभेमध्ये या प्रश्नाची चर्चा झाली होती. रास्ता रोको करून सगळे कार्यकर्ते रस्त्यावर शांतपणे बसले असताना एस्. आर्. पी. च्या गाड्या आल्या आणि त्यांनी कार्यकर्त्यांच्या मोटारसायकली पुलावरून खाली टाकून दिल्या. गावामध्ये शिरून जिथं घरं बंद होती तिथं कौलं फोडून एस्. आर. पी. चे लोक आत शिरले, महिलांनासुद्धा त्यांनी लाथा मारल्या, हाणामार केली. त्यावेळी मी असं म्हटलं होतं की जो गणवेश घालतो तो पोलिस ही कल्पना चुकीची आहे. गणवेश घालून जो पोलिस चोऱ्यांचे धंदे करतो तो गणवेश घातलेला चोर असतो, पोलिस नव्हे.

ही भूमिका स्पष्ट झाल्यानंतर आणि आपलं स्वातंत्र्य टिकवायचं आहे असा निर्धार केल्यानंतर ते टिकविण्यासाठी त्यावेळी ज्याला जे आवश्यक वाटेल ते त्यांनी करायचं आहे. त्यामुळे आता जी आंदोलनं चालू आहेत त्यावर मी टीकाटिप्पणी करण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही."

श्री. शरद जोशींनी आपल्या भाषणात ४२ च्या चळवळीच्या वेळी घडलेली घटना सांगितली. 'आंध्रप्रदेशच्या काँग्रेसने ''ब्रिटीश साम्राज्य खिळखिळं करण्याकरता टपाल कचेऱ्या जाळा, पत्रपेट्या जाळा, रेल्वेचे रूळ उखडा, कचेऱ्यांना आगी लावा, दारू दुकानांवर बहिष्कार घाला, तिथं पिकेटिंग करा' अशा आशयाचं पत्रक काढलं होतं. हे पत्रक ब्रिटिश सरकारनं म. गांधींना दाखवून म्हटलं की काँग्रेसची ही पूर्वतयारी होती म्हणून लोक इतके आक्रमक बनले. तेव्हा गांधीजींनी म्हटलं की मी हे पत्रक फार काळजीपूर्वक वाचलं आहे आणि मला या पत्रामध्ये चूक असं काही दिसत नाही.

आणि ते म्हणाले की, ''महात्मा गांधीपेक्षा आपल्याला अहिंसा जास्त कळते असा अभिमान बाळगण्याचं कुणी कारण नाही.

''औरंगाबादचा निर्णय झाला आणि त्यावर अर्थातच टीकाटिप्पणी झाली. एक्दोन जिल्हा वर्तमानपत्रं सोडली तर सगळ्या वर्तमानपत्रांनी सर्वसाधारणपणे या निर्णयाची टिंगल केली आहे. शरद पवारांनी मात्र आपली प्रतिक्रिया व्यक्त करताना म्हटलं की 'प्रत्यक्षात शेतकरी काय करतात ते पाहू आणि मग ठरवू काय ते?''

शेतकरी खरंच आपल्या स्वातंत्र्याचं रक्षण करण्याकरिता आपले प्राण पणाला लावण्याससुद्धा तयार आहे असं दिसलं तर सगळ्या वर्तमानपत्रवाल्यांची तोंड बंद होतील.

४२ च्या आंदोलनाची घोषणा झाल्यानंतर धुळे जिल्ह्यात लहानशा नंदुरबारमधल्या शिरीषकुमारापासून ते साताऱ्याच्या 'पत्रीसरकार' पर्यंत ज्या तऱ्हेची प्रतिक्रिया आली त्या तऱ्हेची प्रतिक्रिया जर आपल्याकडे आली असती किंवा यापुढे जर आली तर हीच वर्तमानपत्रं 'सम्राट नेपोलियनचे भव्य स्वागत' च्या चालीवर शेतकऱ्याच्या समोर उभे राहातील.

तेव्हा 'करा किंवा मरा' हा निर्णय अमलात आणण्याचे कार्यकर्त्यांच्या आणि शेतकऱ्यांच्या हाती आहे.''

निर्णयाच्या आंदोलनात्मक भागाबरोबरच दुसराही एक भाग 'बळीराज्य गाव' असल्याचे त्यांनी आठवण करून दऊन ते म्हणाले, ''या भागात नेमकं काय करायचं हे सांगितलं आहे. पण काही कार्यकर्ते येऊन विचारू लागले की आमच्याकडे 'नाना पाटील ब्रिगेड' तयार करायची आहे, त्यासाठी काय काय करावे? त्याची घटना, बिल्ले वगैरे असले तर द्या. दुसरे कोणी आले आणि आमचा ऊस दुसऱ्या कारखान्यात न्यायचा आहे. तर 'नाना पाटील ब्रिगेड' ने काय करावं सांगा. हा प्रश्न ज्याच्या मनात येतो तो 'नाना पाटीलां'चं नांव उच्चारायला लायक नाही.

पण, १० नोव्हेंबरपर्यंत गावोगावी

Posted at Market Yard, PSO, Pune 37.
On 23rd December, 1993

**To**

**SHETKARI SANGHATAK**
(Marathi Fortnightly)
Regd. No. 39926/83
December 21, 1993

**PNCW 281**
Licence to post without prepayment
**No. 87**

लक्ष्मीमुक्तीचा कार्यक्रम पुरा व्हावा, दारू दुकानबंदीसंबंधीचे ठराव तरी व्हावेत आणि ज्या गावाने हे दोन कार्यक्रम पुरे केले असतील त्या गावाने गावाच्या बाहेर बळीराज्य गावाची पाटी लावावी ही सूचना स्पष्ट दिली होती. माझ्या मते सर्वांनी औरंगाबाद अधिवेशनाचे निर्णय शांतपणे ऐकले असते आणि इतर काहीही न करता केवळ महाराष्ट्रातल्या निम्म्याअधिक गावांच्या बाहेर जर बळीराज्याच्या पाट्या लागल्या असत्या तर कोणाही वर्तमानपत्रवाल्यांची तोंडं आणि लेखण्या चालल्या नसत्या.

आपल्याला स्वतंत्र व्हायचं आहे. नुसतं बाहेर जाऊन स्वातंत्र्याची लढाई लादून चालत नाही. तुमच्या घरी स्वातंत्र्य आणाल तर तुम्ही स्वातंत्र्य मागायच्या लायकीचे ठरता. घरी लक्ष्मीमुक्ती झाली नसेल तर शेतकऱ्यांच्या स्वातंत्र्याच्या गोष्टी करण्यात काय अर्थ आहे? आणि घरची लक्ष्मी स्वतंत्र झाली नाही तर आपल्या स्वातंत्र्यलढ्यात खांद्याला खांदा लावून ती मनोभावे कशी उतरेल?''

असे विचारून कार्यकर्त्यांनी अजूनही हे दोन कार्यक्रम गावोगाव अमलात आणून बळीराज्याच्या पाट्या जास्तीत जास्त गावी लागतील यासाठी प्रयत्नशील राहावे असे अवाहन केले. 'या पाट्या जितक्या जास्त संख्येने लागतील–लक्ष्मीमुक्ती आणि दारू दुकानबंदीचे कार्यक्रम करून–तितकी शेतकरीविरोधकांना जरब बसेल की शेतकरी त्यांच्या स्वातंत्र्याच्या रक्षणास सज्ज आहेत.' असेही त्यांनी सांगितले.

आपल्या भाषणांत शरद जोशींनी अर्थमंत्र्यांबरोबर झालेल्या चर्चेच्या (११ डिसेंबर १९९२) अहवालही दिला. डंकेल प्रस्तावाच्या निमित्ताने GATT ला सादर करावयाच्या अहवालात सरकारने शेतकऱ्यांना उणे सबसिडी दिली जाते हे मान्य केले असले तरी आकडेवारीमध्ये खोटेपणा करून सबसिडीतला उणेपणा कमी दाखविण्याचा प्रयत्न केला असल्याचे त्यांनी अर्थमंत्र्यांच्या निदर्शनास आणले व प्रत्यक्षात शेतकऱ्यांना सरासरी उणे ४७ टक्के सबसिडी दिली जाते हे सरकारची आकडेवारी अविश्वसनीय असली तरी, त्यावरूनही आकडेवारीने सिद्ध करून दाखविले. खरीखुरी आकडेवारी उपलब्ध झाली तर सबसिडीतला उणेपणा अधिक दिसेल.

आपल्या भाषणात शेवटी त्यांनी कार्यकर्त्यांना, त्यांनी औरंगाबादचा स्वातंत्र्याचा निर्णय, त्याचा अर्थ आणि स्वातंत्र्य टिकविण्यासाठी आवश्यक ती रणनीती जास्तीत जास्त शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवावी आणि खुल्या व्यवस्थेतील लाभ पुन्हा एकदा लुटारुंच्या हाती जाणार नाहीत याची काळजी घ्यावी असे आवाहन केले.

*(जागे अभावी शरद जोशींचे कार्यकारिणीतील संपूर्ण भाषण प्रकाशित करता येत नाही याबद्दल दिलगीर आहे.)*

●●●

## बळीराज्य गावाच्या पाटीचा नमुना




लक्ष्मीमुक्ती व दारूदुकानबंदी हे दोनही कार्यक्रम करणाऱ्या गावाने आपल्या सर्व वेशींवर वरील नमुन्यात पाटी उभी करावयाची असून बळीराज्यातील या गावाच्या स्वातंत्र्याची द्वाही देणाऱ्या पाट्या आणि गावातील सर्व स्त्री-पुरुषांचे स्वातंत्र्य यांचे संरक्षण करण्याचे काम 'नाना पाटील ब्रिगेड'ने करावे.

**शेतकरी संघटना**

**६ व २१ तारखेला प्रसिद्ध होतो.**
**प्रकाशन स्थळ व पत्रव्यवहाराचा पत्ता**
**अंगारमळा, मु. पो. आंबेठाण (४१० ५०१)**
**ता. खेड, जि. पुणे.**

**संपादक, मुद्रक, प्रकाशक**
**सुरेशचंद्र म्हात्रे**
**फोन : द्वारा - चाकण २३५४, २४६८**

**पाक्षिक शेतकरी संघटक**
**मालक – मोहन बिहारीलाल परदेशी**
**मुद्रण स्थळ – गणेश प्रिंटर्स,**
**६९३, बुधवार पेठ, पुणे - २.**